cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१९६ | शनिवार, दि.९ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## नितीहिन राजकारणात मतदार संभ्रमात...

आपण नेमके कोणाला मत देतो आहोत आणि का देत आहोत किंवा देणार आहोत यामुळे महाराष्ट्रातील मतदार चक्रावला आहे. त्याहीपुढे निवडणुकीनंतर आणखी मोठे बदल घडतील अशीही वाच्यता आहे. म्हणजे नेमके काय होणार आहे? आता एकत्र लढणाऱ्या मित्रांची अदलाबदली घडणार आहे की सिक्कीमप्रमाणे विरोधी पक्षच राहणार नाही. हा सगळा प्रकार चक्रावणारा आहे. त्यात राज्य कोणत्या दिशेने जाणार याचा अदमास लागेनासा झाला आहे.

## सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड निवृत्त

नवी दिल्ली: भारताचे ५० वे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचा सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचा शुक्रवार हा (दि.८) शेवटचा दिवस होता. कामकाज आटोपल्यानंतर त्यांनी उठून सर्वांना नमस्कार केला. तत्पूर्वी सर्वोच्च न्यायालयातील रेकॉर्ड असोसिएशनवरील वकिलांनी त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन केले होते. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या निवृत्तीनंतर सेवा ज्येष्ठतेनुसार संजीव खन्ना हे भारताचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारणार आहेत. ते सोमवार, ११ नोव्हेंबर रोजी पदाचा कार्यभार स्वीकारतील. भारतीय संविधानाचे रक्षणासाठी सरन्यायाधीशांची भूमिका मध्यवर्ती मानली जाते.

# कांदा उत्पादकांची भावना समजतो, सत्ता आल्यास शेतकऱ्यांना पंधरा हजार देणार–पंतप्रधान नरेंद्र मोदी



**नाशिक। प्रतिनिधी**

**डबज इंजिन सरकारमध्ये विकासाची गती डबल होते. योजनांचा लाभ पण डबल होता. येथे शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान, नमो शेतकरी सन्मान निधी मिळत आहे. वर्षाला बारा हजारांची मिळणारी मदत वाढवून पंधरा हजार करण्यात येणार असल्याचे मोदी म्हणाले. तसेच मी कांदा उत्पादकांची भावना समजतो. त्यासाठी कांदा निर्यातीच्या नियमांमध्ये बदल केले आहेत असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.**

पंतप्रधान मोदी नाशिकमध्ये महायुतीच्या प्रचार सभेत बोलत होते. मोदी पुढे म्हणाले, आज महाराष्ट्र व देशाचा विकास होतो आहे. कारण या देशात गरिबांची काळजी करणारे सरकार आहे. गरीब प्रगती करतो तेव्हाच देशाची प्रगती होते. काँग्रेसने इतक्या वर्षात गरिबी हटावचा केवळ नारा दिला. मात्र, तरीही देशातील गरीबी काही कमी झाली नव्हती. देशातील लोक अन्न वस्त्र व निवाऱ्यापासून वंचितच राहिले. आज मात्र गेल्या दहा वर्षात २५ करोड लोक गरीबीतून बाहेर आले आहेत. ये होऊ शकलं कारण मोदी हा गरिबांचा सेवक म्हणून काम करतो. महाराष्ट्रातील ५० लाखांहून अधिक महिलांना उज्ज्वला योजनेंतर्गत मोफत गॅस कनेक्शन देण्यात आले आहेत. जल जीवन अभियानांतर्गत राज्यातील १.२५ कोटींहून अधिक घरांमध्ये नळाच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्रातील सुमारे ७ कोटी गरजूंना दरमहा मोफत रेशन मिळत आहे. राज्यातील २६ लाखांहून अधिक गरीबांना पंतप्रधान आवास योजनेचा लाभ मिळाला आहे. त्यांना कायमस्वरूपी घरे देण्यात आली आहेत. त्यांच्यासाठी असेच काम सुरू राहावे, यासाठी महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन होणे गरजेचे आहे. येथे सोयाबीन, कापूस, धान आणि दुधाचे उत्पादन घेतले जाते. पेट्रोलमध्ये इथेनॉल ब्रँडिंग वाढल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे.

◀◀ पान २ वर

## डॉ.योगेश क्षीरसागर सेवक म्हणून काम करतील-डॉ.सारिकाताई क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

**बीडचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर हे बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेचे सेवक म्हणून पुढील ५ वर्ष काम करतील, असे प्रतिपादन डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.**

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ त्यांच्यासह पत्नी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात झंजावाती प्रचार दौरा सुरू केला आहे. शुक्रवारी (दि.८) डॉ.सरिकाताई क्षीरसागर यांनी पाली व चौसाळा जिल्हा परिषद गटातील विविध गावात जाऊन संवाद साधला. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी नाळवंडी जिल्हा परिषद गटातील अंतरवन पिंपरीसह तांडा, खांडे पारगाव फाटा, नागपूर बुद्रुक, नागापूर खुर्द, उमरी, उमरद खालसा, म्हाळसजवळा, मासापूर, पिंपळगाव, ईट, गंगनाथवाडी, बाभूळवाडी, बेलवाडी या गावांच्या एकत्रित चार बैठका घेतल्या. तसेच, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी पाली व चौसाळा जिल्हा परिषद गटातील समनापूर, कोल्हारवाडी, आहेरवडगाव, कर्जनी, कपिलधारवाडी, मांडवजाळी, धनगरवाडी, करचुंडी, कोळवाडी, साखरे बोरगाव, गोगलवाडी, खडकीघाट, तांदळवाडी घाट, हिंगणी खू., चांदेगाव,

◀◀ पान २ वर

# पवारांचा बीडचा मुक्काम आघाडीच्या उमेदवारांचा 'खुटा' मजबूत करणार!





**बीड । प्रतिनिधी**

**आज बीड जिल्ह्यातील आष्टी, बीड, आणि परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि महाराष्ट्राचे जुने जाणते नेते ज्यांना 'जाणता राजा' म्हटलं जातं .असे शरदचंद्र पवार बीडला तिन्ही सभा झाल्यानंतर मुक्काम करणार आहेत. त्यांचा मुक्काम बीड जिल्ह्यातील बीड, परळी, गेवराई ,माजलगाव ,आष्टी आणि केज विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांचा खुटा मजबूत करण्यासाठीच असल्याने या उमेदवारांना आता पवारांची 'संजीवनी' मिळणार आहे. पवारांच्या सभेनंतर जिल्ह्यातील वातावरणात अमुलाग्र बदल होईल अशी शक्यता राजकीय क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.**

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये शरद पवारांचा मोठा दबदबा आहे .अगदी प्रतिकूल परिस्थितीमध्ये ही त्यांनी आपला पक्ष आणि अस्तित्व अबाधित ठेवले. सुरुवातीला काँग्रेस मधून बाहेर पडल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली. आणि अवघ्या काही महिन्यातच निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्ये बऱ्यापैकी यश मिळवून त्यांनी सत्ताही काबीज केली. मोठा अनुभव पाठीशी असलेल्या शरद पवारांचा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्याचा गाढा अभ्यास आहे. प्रत्येक ठिकाणचे जुने कार्यकर्ते आणि स्नेही आजही त्यांच्यासोबत आहेत. मागील काही काळामध्ये त्यांचे पुतणे अजितदादा पवार यांनी त्यांना सोडून महायुती बरोबर सरकारमध्ये वाटा मिळवला. ही बाब शरद पवारांच्या चांगलीच जिव्हारी लागली. त्यानंतर लोकसभा निवडणुकीमध्ये शरद पवार यांनी आपला कस लावून बऱ्यापैकी यश मिळवले. आता विधानसभा निवडणुकीमध्ये संपूर्ण राज्यामध्ये व्यक्तिगत लक्ष देऊन ते आघाडीचे उमेदवारासाठी प्रयत्नशील आहेत. विशेषता त्यांचे लक्ष बीड जिल्ह्यावर अधिक आहे. या जिल्ह्यांमध्ये त्यांनी परळी मतदारसंघात हस्तक्षेप करून काँग्रेसच्या उमेदवाराला राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी देत या ठिकाणच्या लढतीला वेगळी रंगत आणली. ज्यावेळी अजितदादा पवार शरदचंद्र पवार यांना सोडून गेले. त्यांच्यासोबत बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार गेले. फक्त बीड विधानसभेचे एकमेव आमदार संदीप क्षीरसागर शरदचंद्र पवार यांच्यासोबत ठाम राहिले. यामुळेच पवार साहेब जिल्ह्यात मुक्काम ठोकून जे निष्ठावंत आहेत. त्यांच्यासाठी खुटा मजबूत करणार आहेत आणि जे सोडून गेले त्यांना घरी बसवण्यासाठी नवीन रणनीती आखणार

◀◀ पान २ वर

## मोदी-शाह यांचा प्रयत्न चालणार नाही -पटोले

मुंबई: विधानसभेच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पराभवाची चाहूल लागल्यानेच जाती व धर्माच्या नावाने मतांचा जोगवा मागत आहेत. जाती धर्माच्या उतरंडी ही मनुवादी भाजपाचीच

◀◀ पान २ वर

## रमेश आडसकरांच्या रुपात मिळणार कार्यक्षम आमदार- जगदीश फरताडे



**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव मतदासंघांचे प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित अवस्थेत आहेत या जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कार्यक्षम लोकप्रतिनिधी सभागृहात जायला हवा परंतु दुर्दैवाने लोकप्रतिधींनी दुर्लक्ष केल्याचे मतदारसंघ विकासाच्या बाबतीत कोसो दूर राहिला परंतु रमेशआडसकरांच्या माध्यमातून मतदारसंघातील प्रश्न सुटण्यासाठी जनतेला चांगली संधी प्राप्त झाल्याचे मत युवा नेते जगदीश फरताडे यांनी व्यक्त केले.**

आज देवडी ता वडवणी येथे शेतकरी व मराठा यांच्या आंदोलनाच्या माध्यमातून राज्यभर प्रसिध्द झालेले युवा नेते जगदीश फरताडे यांनी अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यां समवेत पाठिंबा दिला या प्रसंगी रमेश आडसकरांनी त्यांचे स्वागत करुन भविष्यात पाठींबा देणाऱ्या या तरुणांना योग्य

◀◀ पान २ वर

## विकास काय असतो हे करून दाखवतो–अमरसिंह पंडित

### एकवेळ विजयसिंह पंडित यांना विजयी करून सत्ता द्या



**गेवराई । प्रतिनिधी**

**लोकप्रतिनिधी हा सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणारा असावा तो फक्त आजारपणाचे कारण सांगून घरात बसणारा नसावा. सत्ता असूनही ज्यांना आपल्या भागाचा विकास करता येत नाही त्यांना लोकप्रतिनिधी म्हणावे कसे ? विरोधकांनी मिळालेल्या सत्तेचा वापर फक्त स्वार्थ साधण्यासाठी केला, विकासाचे आणि त्यांचे सोयरसुतक नव्हते अशी सडकून टिका करत मला जर सत्ता मिळाली तर विकास**

◀◀ पान २ वर

### सुचना

तांत्रिक कारणामुळे दि.८ नोव्हेंबर रोजी दैनिक राज्य लोकतंत्रचा अंक प्रकाशीत होवू शकला नाही. या बद्दल सर्व वाचकांची दिलगिरी व्यक्त करत आहोत.

–व्यवस्थापक

## बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला संधी द्या

### अनिलदादा जगताप यांचे मतदारांना आवाहन



**बीड। प्रतिनिधी**

गेली अनेक वर्ष सत्ता भोगून क्षीरसागरांना केवळ बीडकरांच्या विश्वासाचा घात करत स्वतःचे घरं भरण्याचे काम केले आहे आणि बीडकरांना विकास तर सोडाच पण मूलभूत गरजांपासून वंचित ठेवण्याचे महापाप केले आहे. सत्तेचा ताम्रपट घेऊन क्षीरसागरांच्या पिढ्यानुपिढ्या बीडवर आपली मक्तेदारी चालवत आल्या आहेत व बीड विकासाचा खेळखंडोबा करत आहेत. मात्र क्षीरसागरांच्या पापांचा घडा भरला असून सामान्य घरातील बीड विधानसभेचे अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्या पाठीशी शहर-ग्रामीण भागातील मतदार मोठ्या ताकदीने उभा राहिला असल्याचे माहिती माजी राज्यमंत्री प्रा. सुरेश नवले यांनी दिली आहे.

◀◀ पान २ वर

## पवार साहेबांच्या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहा–आ.संदीप क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या राजकारणाची सर्व समीकरणे बदलणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे अध्यक्ष महाविकास व इंडिया आघाडीचे प्रमुख नेते खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या बीड जिल्ह्यात सभा होणार आहेत. आपल्या सर्व उमेदवारांसाठी पवार साहेब 'वारं फिरविणार' आहेत. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान एकनिष्ठ आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासाठी खा.शरदचंद्र पवार साहेब शनिवारी (दि.९) रोजी छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, छत्रपती

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.८ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,७०० | ३,०५० | २,८७५ |
| ज्वारी/हायब्रिड: २०.५० क्विंटल | २,०३३ | २,२३५ | २,१८२ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ११.५० क्विंटल | ५,२०० | ८,४०१ | ७,११७ |
| उडीद :८.५० क्विंटल | ४,८०० | ७,९०० | ६,९४८ |
| बाजरी: ३.५० क्विंटल | २,५३१ | २,६८१ | २,५८१ |
| मुग : १२.५० क्विंटल | ७,०७१ | ७,०७१ | ७,०७१ |
| सोयाबीन: ३९२.५० क्विंटल | ३,२०० | ४,२३१ | ४,०६१ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |

# दहा वर्षांत एकाही विरोधी कार्यकर्त्यांची व त्यांच्या कामाची कधीच अडवणूक केली नाही–आ.लक्ष्मण पवार



**गेवराई । प्रतिनिधी**

**मतदारसंघातील जनतेने दोन वेळा सेवा करण्यांची संधी दिली, या काळात मी विकास कामे करताना कोणत्याच गावच्या बाबतीत हेवा दावा न करता प्रामाणिक काम केले. तसेच या दहा वर्षाच्या आमदारकीच्या काळात मतदारसंघातील एकाही विरोधी गटातील कार्यकर्त्यांची अथवा त्यांच्या कामाची कधीच अडवणुक केली नसल्याने या सर्व जनतेचे आशीर्वाद आपल्यालाच मिळतील असा विश्वास आ. लक्ष्मण पवार यांनी व्यक्त केला.**

गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आमदार लक्ष्मण पवार यांनी निवडणूक प्रचारार्थ कुरणपिप्रि, बोरगाव, नवे बोरगाव, मालेगाव खु., मालेगाव बु., गायकवाड जळगाव, उमापुर, बोरी पिंपळगाव,यासह परिसरातील अनेक गावात जाऊन मतदारांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते. यावेळी जे.डी.शहा, आबेद पटेल, राजेंद्र भंडारी, शाम कुंड, दादासाहेब गिरी, याहिया खॉन, अरविंद जाधव, विजय डरपे, ॲड.सुरेश पवार, प्रकाश गाडे, महेश चेके,बंडु गवारे, विश्वास निंबाळकर, चेअरमन गंगाधर, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नितीहिन राजकारणात मतदार संभ्रमात...

आपण नेमके कोणाला मत देतो आहोत आणि का देत आहोत किंवा देणार आहोत यामुळे महाराष्ट्रातील मतदार चक्रावला आहे. त्याहीपुढे निवडणुकीनंतर आणखी मोठे बदल घडतील अशीही वाच्यता आहे. म्हणजे नेमके काय होणार आहे? आता एकत्र लढणाऱ्या मित्रांची अदलाबदली घडणार आहे की सिक्कीमप्रमाणे विरोधी पक्षच राहणार नाही. हा सगळा प्रकार चक्रावणारा आहे. त्यात राज्य कोणत्या दिशेने जाणार याचा अदमास लागेनासा झाला आहे.

महाराष्ट्र देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे हे खरे आहे. उद्योग, शिक्षण, आरोग्य, महसूल, करदाते अशा सगळ्यांच बाबींत वर आहे. केवळ विरोधक ते मानत नाहीत. अर्थात, ते सत्तेवर आल्यावर त्यांचाही हाच दावा आणि आकडेवारी असते जी आताचे सत्ताधारी देत असतात; पण विरोधात असताना या गोष्टी मान्य केल्या तर विरोध कशाचा करणार या न्यायाने ते टीका करत असतात. महाराष्ट्राच्या या विशेष स्थानामुळे दिल्लीचा अथवा त्या त्या वेळेच्या दिल्लीश्वरांचा महाराष्ट्रावर डोळा राहिला आहे. प्रगत राज्य आपल्याकडे असावे असे सगळ्यांना वाटते. तथापि, आताच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील राजकारण खरेच आपल्या प्रगत राज्य या लौकिकाचा वारसा सांगते आहे असे दिसत नाही. पक्षांच्या विचारधारांशी बांधिलकी राखत येथे निवडणुका लढल्या गेल्या आणि मतदारांनीही कौल दिला. साधारण अर्धे शतक येथे प्रगतीशील आणि सर्वसमावेशक विचारांचे सरकार राहिले आणि त्यामुळेच राज्य पुढे गेले. चालू दशकात किंबहुना गेल्या पाच-सात वर्षांत मती कुंठित करणाऱ्या घटना घडल्या. पुरोगामी विचारधारेचा अभिमान मिळवणारी मंडळी अचानक ज्यांना जातीवादी किंवा प्रतिगामी म्हणून हिणवत होती त्यांच्या मांडवात जाऊन बसली. तद्वतच धर्माच्या नावाने आणाभाका घेणारे आणि आपली कट्टरता अलंकारासारखी सांभाळणारे अचानक सर्वसमावेशकतेची प्रौढी सांगणाऱ्यांच्या गोटात जाऊन बसले. विशेष म्हणजे ही जी अदलाबदली झाली ती दोन्ही बाजूंनी मनापासून स्वीकारली आणि अगदी सहजपणे नवे मित्र एकरूप झाले. मग प्रश्न असा येतो की इतकी वर्षे परस्परांना पुरोगामी आणि प्रतिगामी म्हणून तुटून पडणाऱ्यांत जर एवढेच सख्य होते तर अगोदरच सगळ्यांनी एकत्र यायला हवे होते. आता जातनिहाय जनगणनेचा मुद्दाही सगळ्यांच्या हाताशी आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर समोर आलेला हा विषय अजूनही थंड झालेला नाही. आता जनगणना केली जाण्याचे सूतोवाच करण्यात आले असले, तरी जातगणना होणार का याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मात्र, महाराष्ट्राच्या निवडणुकीत जात फॅक्टर अचानक स्ट्राँग झाला आहे. त्याअनुरूप उमेदवारांच्या निवडी करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी प्रबळ इच्छुक असूनही केवळ जातीत बसत नसल्यामुळे त्याला डावलून आपल्याकडचा प्रबळ आणि हवा त्या जातीचा उमेदवार मित्रपक्षाला निर्यात करून त्याची उमेदवारी जाहीर केली गेली आहे.

प्रत्येक मतदारसंघांमध्ये दोन प्रमुख आघाड्यांचे अधिकृत उमेदवार, त्या आघाड्यांमधील मित्रपक्षांचे असंतुष्ट उमेदवार, ज्यांना लढायचेच आहे असे अपक्ष आणि आपणच निवडून येणार कारण जात हा फॅक्टर आपला मजबूत आहे असे मानणारे अन्य प्रबळ अशी उमेदवारांची भाऊगर्दी झालेली पाहायला मिळते आहे. उमेदवारीच्या माघारीच्या दिवशी सगळ्या बंडखोरांचे बंड थंड होईल असा आव आणला गेला तरी प्रत्यक्षात तसे झाले नाही. त्याचे कारण आमदार होण्याची क्षमता असलेले किंवा पूर्वी आमदारकी भूषवली आहे मात्र नव्या मित्रांमुळे बिचाऱ्यांना आपल्याच मतदारसंघात सतरंज्या उचलण्याची वेळ आली आहे असे उमेदवार रिंगणात कायम आहेत. सत्ताधारी आघाडीचे १८ तर विरोधी आघाडीतील २२ उमेदवारांना शांत करण्यात अपयश आले आहे. मात्र हे खरेच अपयश आहे की त्यांना लढण्याची मूकसंमती दिली गेली आहे हेही गौडबंगाल आहे. कारण बंडखोरांना उभे राहण्यात दिली गेलेली रसद ही दुसऱ्या आणि अखेरच्या अंकाची पूर्वतयारी आहे.

निकालाच्या दिवशी कोणत्या एका आघाडीला स्पष्ट जनादेश मिळाला तर आणि त्यांची एकत्र राहण्याची तयारी असेल तर ठीक, अन्यथा आपण बाजू बदलून पलीकडे गेलो आणि त्यांचे गणित जुळत असेल तर तिकडे जाण्याचा पर्यायही खुला ठेवला गेला आहे. त्या दृष्टिकोनातूनही ही प्रबळ बंडखोर मंडळी सत्ता सिंहासनापर्यंत पोहोचवण्यात उपयुक्तच ठरणार आहे. किंबहुना त्यांनी त्याचवेळी पडद्यामागून समोर यावे अशी रचना केली गेली आहे. आज दोन आघाड्या परस्परांशी लढत आहेत आणि त्यातील एका आघाडीचे सरकार येईल असे दिसत नाही.

## ‘मराठा खानावळी’ च्या एकजातीय घराणेशाहीला आव्हान देणाऱ्यावर हल्ले, वंचित बहुजन आघाडी ‘जशास तसं उत्तर देणार’-अजय सरवदे

### ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध

बीड । प्रतिनिधी

**नांदेड जिल्ह्यात प्रचारासाठी दौऱ्यावर असताना ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर भ्याड हल्ला करण्यात आला. आम्ही या हल्ल्याचा तीव्र निषेध बीड जिल्ह्याच्या वतीने करत आहोत. विधानसभा निवडणुकीत मराठा खाणावळीच्या एकजातीय घराणेशाहीला आव्हान देणाऱ्यांना जर अशाप्रकारे हिंसक हल्ले करून रोखण्याचा प्रयत्न होणार असेल तर वंचित बहुजन आघाडी हे कदापि सहन करणार नाही.**

सर्वसामान्य ओबीसी बांधवांच्या हक्काचं रक्षण करण्यासाठी आणि एससी, एसटी, ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी वंचित बहुजन आघाडी कटीबद्ध आहे. प्रस्थापित मराठा नेतृत्वाच्या घराणेशाहीच्या सत्तेला आव्हान निर्माण झाल्यामुळे ते बिथरले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुती या मराठा खानावळ आहेत. या मराठा खानावळीनेच आपल्या हस्तकांच्या माध्यमातून लक्ष्मण हाकेवर हल्ला केला आहे. असे हल्ले घडवून राज्यात दहशतीचं वातावरण निर्माण केलं जात आहे. वंचित बहुजन आघाडी ही दहशत बिलकुल खपवून घेणार नाही. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आम्ही आज जाहीर करीत आहोत की, महाराष्ट्रात ओबीसी नेत्यांवर पुन्हा असे भ्याड हल्ले केले तर जशास तसं उत्तर देण्यात येईल हल्ला करणाऱ्यांच्या नेत्यांना आम्ही जिल्ह्यात फिरू देणार नाही असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी दिला आहे.

## पृथ्वीराज साठे यांच्या विजयासाठी संगीता ठोंबरे यांनी कंबर कसली

केज । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी विधानसभा निवडणूकीतून उमेदवारी माघारी घेतल्यानंतर आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. त्यांच्यावर राष्ट्रवादीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पक्षाची जिम्मेदारी मिळतात पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्यासाठी माजी आमदार संगीताताई ठोंबरे ह्या



मतदारसंघात आपल्या जिवाचे रान करताना दिसून येत आहे. बीड जिल्ह्याचे खा. सोनवणे यांच्या उपस्थितीत माजी आ. संगिता ठोंबरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी ठोंबरे यांना पक्षाच्या वतीने मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र ठोंबरे यांना खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांची निवड होतात त्यांनी केज विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारासाठी चांगली कंबर कसली आहे त्यांनी मतदारसंघातील अनेक गावांना भेटी दिल्या आहेत.

## माजलगाव विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार मोहनराव जगताप यांचा विजय निश्चित-परमेश्वर सातपुते



माजलगाव । प्रतिनिधी

**माजलगाव विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे यांनी आज माजलगाव विधानसभा मतदारसंघातील सोन्ना थोटा, पिंपळटक्का, पिंपळा व चिखल बीड, चिंचवण गावांमध्ये कॉर्नर बैठका घेऊन मतदार बंधुशी संवाद साधला.**

याप्रसंगी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी गावोगावी मतदार बंधूंना संबोधित करत येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मोहन दादा जगताप यांना मतदान रुपी आशीर्वाद देऊन प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन केले. यावेळी शेतकरी नेते गंगाभीसेनजी थावरे, राष्ट्रवादी माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायणजी डख, शेतकरी कामगार पक्षाचे मोहन भाई गुंड, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, प्रा. श्रीरामजी मुंडे, राष्ट्रवादीचे धारूर तालुकाध्यक्ष युवराज लगड, युवासेनेचे वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथ मोरे, युवानेते एकनाथ पवार, अजय गायकवाड, महादेव महाराज खोटे, गणेश टिकुळे, रामेश्वर कदम, अशोक कदम, माधव बापू आंधळे, शुभम मस्के, महादेव भाऊ जमाले, मारोती मुंडे, पांडुरंग होंडे सह सर्व गावातील मतदार बंधू, भगिनी उपस्थित होते.

## शरद पवारांच्या सभेला उपस्थित रहा-खुर्शीद आलम

बीड । प्रतिनिधी



बीड विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पार्टीचे व तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार संदीप भैया क्षीरसागर साहेब यांच्या प्रचारार्थ पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष देशाचे धर्म निरपेक्ष नेते शेतकरी गोरगरीब जनतेचे कैवारी जाणते राजे मुलुख मैदानी तोफ खासदार शरद चंद्रजी पवार साहेब यांची बीड मतदार संघातील आ.संदिप भैय्या यांच्या प्रचारासाठी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण (मल्टी पर्पज ग्राऊंड) वर नऊ नोव्हेंबर सायंकाळी सहा वाजता सभा होणार आहे, तरी बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेने या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे बीड शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे नम्र आव्हान केले आहे.

## मंगळवारी चातुर्मासउत्सव ज्ञानेश्वरी प्रवचन सेवेची सांगता

बीड । प्रतिनिधी

बीड येथील स्वराज्य नगर मधील ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह.भ.प माधव महाराज डाके काठवडेकर यांच्या माऊली निवास येथे दरवर्षी चातुर्मास्? उत्सवानिमित्त प्रति सोमवारी ग्रंथराज ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा आयोजित केली जाते. या चातुर्मास उत्सव प्रति सोमवार प्रवचन सेवेचे हे वे९ वर्ष आहे. या उत्सवात प्रति सोमवारी या चातुर्मास उत्सवानिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरीवर नामवंत प्रवचनकार कीर्तनकार भागवत कथाकार आदी महाराज मंडळींची प्रवचन सेवा संपन्न झाली आहे . या प्रवचन सेवेच्या उत्सवानिमित्त सुरू असलेल्या प्रवचन सेवेची सांगता प्रबोधिनी एकादशी, कार्तिक शुद्ध एकादशी दिवशी म्हणजेच दि. १२/११/२४ रोजी रात्री ७ते८ या वेळेत ह.भ.प. दादासाहेब गीते महाराज खंडाळा यांच्या प्रवचन सेवेने होणार आहे. सर्व भाविक भक्तांनी या चातुर्मास उत्सव सांगतेच्या प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा असे ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह भ प माधव महाराज डाके यांनी केले आहे.


**प्रपत्र सी -१**

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

उमेदवाराचे नाव : **सुरेश रामचंद्र धस**, मु.पो. जामगांव, ता.आष्टी जि.बीड
राजकीय पक्षाचे नाव : **भारतीय जनता पार्टी**
निवडणुकीचे नाव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४**
मतदारसंघाचे नाव : **२३१ - आष्टी विधानसभा मतदारसंघ**

मी **सुरेश रामचंद्र धस** वर नमुद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असुन, माझ्या फौजदारी पूर्व चरित्राबद्दल पुढील तपशिल जनतेच्या माहितीसाठी घोषीत करीत आहे.

| अ. क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्र. व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती | संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधांचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी पाटोदा, ता.पाटोदा जि.बीड | S.C.C. No. – 203/2022, Date 26.09.2022 Cr. No. 207/2020 | प्रलंबित | 188, 269, 270 I.P.C. Sec 51(B) of DM Act 2005 |
| २ | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी आष्टी, ता.आष्टी जि.बीड | R.C.C. No. – 141/2022 Date 11.07.2022 Cr.No. 224/2021 | प्रलंबित | 143, 147, 148, 149, 427, 448, 504, 506 I.P.C. |
| ३ | मुख्य न्याय दंडाधिकारी बीड, ता.जि.बीड | S.C.C. No. – 104/2022, Date 21.01.2022 Cr.No. 117/2021 | प्रलंबित | 188, 269, 270 I.P.C., D.M.A. 51(B), EP.D. ACT 2, 3, 4, |
| ४ | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी शिरुर कासार, ता.शिरुर कासार जि.बीड | S.C.C. No. – 12/2021, Date 12.01.2021 Cr.No. 161/2020 | प्रलंबित | 188, 269, 270 I.P.C. Sec 51(B) of DM Act 2005 |
| ५ | पोलीस स्टेशन आष्टी जि.बीड | FIR No. 386/22 Date 29.11.2022 | प्रलंबित | Sec. 13(1)(A)(B), 13(2) of Pre. of corruption Act 1988 Sec. 420, 465, 467, 468, 471, 120(B) 109 of I.P.C |

| (ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिध्द ठरविलेल्या प्रकरणांचा तपशिल | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशाचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| १ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| २ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

आपला
**सुरेश रामचंद्र धस**


## पान १ वरून...

पान १ वरून...

### कांदा उत्पादकांची भावना समजतो,

इथेनॉल खरेदीसाठी शेतकऱ्यांना गेल्या १० वर्षांत सुमारे ८० हजार कोटी रुपये मिळाले आहेत. देशाचा पैसा पेट्रोल घेण्यासाठी विदेशात जायचा. आता ते पैसे माझ्या देशातील शेतकऱ्यांना मिळत आहेत. ते म्हणाले की, येथील कांदा शेतकऱ्यांच्या भावना मला समजतात. त्यामुळे कांद्याची निर्यात सुलभ करण्यासाठी धोरणे बदलण्यात आली आहेत.

-----------

### पवारांचा बीडचा मुक्काम

आहेत. जिल्ह्यातील शरद पवार साहेबांना मानणाऱ्या सर्व लोकांना सोबत घेऊन महाआघाडीच्या जास्तीत जास्त जागा आणण्यासाठी त्यांचा प्रयत्न आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये खा. बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी जसे संदीप क्षीरसागर ,पृथ्वीराज साठे यांनी काम केले तसेच गेवराईचे माजी आमदार बदामराव पंडित यांनीही मोठे परिश्रम घेतले. त्यामुळे महाआघाडीतील गेवराईचे उमेदवार बदामराव पंडित यांच्यासाठीही ते प्रयत्न करतील. याशिवाय आष्टीचे उमेदवार मेहबूब शेख, माजलगाव चे उमेदवार मोहनराव जगताप, केजचे उमेदवार पृथ्वीराज साठे, परळीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यासाठीही ते आपली फिल्डिंग लावतील अशी शक्यता दिसत आहे. आणि या कारणासाठीच शरद पवार यांचा बीडला मुक्काम असणार आहे. हा मुक्काम भल्या भल्यांना घाम फोडणारा ठरणार असून पवार साहेबांना मानणारे सर्व निष्ठावंत एकत्र करून आघाडीच्या उमेदवारांना नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न शरदचंद्र पवार करतील असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

---------

### डॉ.योगेश क्षीरसागर सेवक म्हणून

पालसिंगण, चांदणी, चौसाळा, वाढवणा, मानेवाडी, रुईघवन, माळेवाडी, चौसाळा, घारगाव देवी, बाबुळगाव, हिंगणी बु, सुलतानपूर, गोलंगरी लोणी घाट, वडवाडी यासह इतर गावांची एकत्रित बैठक घेऊन ग्रामस्थांची संवाद साधला. या दौऱ्यात ठिकठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी स्वागत केले.

------------

### विकास काय असतो हे करून

काय असतो हे मी करून दाखवतो फक्त एकवेळ महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना विजयी करून विकासपर्वाला प्रारंभ करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी केले. महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील राक्षसभुवन, गुळज, पाथरवाला, कुरणपिंप्री, बोरगाव आदी गावांना भेटी देवून मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि तालुक्यामध्ये रखडलेल्या विकास योजना गतीमान करण्यासाठी सत्ता हवी आहे. सत्ता नसतानाही मी जलसिंचनावर मोठे काम केले, तालुका पाणीदार व्हावा ही आपली प्रामाणिक भुमिका आहे, येणाऱ्या काळात शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी कायम प्रयत्नशील राहिल. केवळ निवडणुकीपुरते आपण भाषणे ठोकत नसून यापूर्वीही लोकांच्या कामात होतो आणि यानंतरही कामात राहील याची मी ग्वाही देतो. गेवराई विधानसभा मतदार संघात पुन्हा विकासाच्या कक्षेत आणण्यासाठी महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना प्रचंड मतांनी विजयी करा असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी राक्षसभुवन येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्यासह तात्यासाहेब नाटकर, काकासाहेब नाटकर, शमीयोद्दीन काझी, राजाराम वालेकर, संभाजी नाटकर, जहूर काझी, कल्याण नाटकर, रघु कोंढरे, बालासाहेब पाठक, प्रदिप काळम, जगन्नाथ धुमाळ, बोरगाव येथे अशोक जाधव, परिक्षीत जाधव, ब्रम्हनाथ जाधव, तात्या जाधव, भाऊसाहेब जाधव, कुरणपिंप्री येथे बालम पटेल, आर.के.पटेल, कलीम पटेल, शेख बादशाहभाई, अजीज पठाण, अयुब शेख, रज्जाक पटेल, नाजीम पटेल, नसीर पठाण, गुंतेगाव पाथरवाला येथे सरपंच बाबासाहेब जाधव, नंदकिशोर गोर्डे, चंदू जाधव, मदन गोर्डे, सुनिल पारे, सोमनाथ मस्के, गंगाधर हाके, पाराजी भवर, सुभाष गोर्डे, गणेश गुंते, धनंजय जाधव, विष्णूपंत आर्सुळ, रुस्तूम घनवट, अंकुश वाकडे, गुलाब वाकडे, शेख निजाम, प्रविण घनवट, विक्रम गवारे, शामराव आर्सुळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमरसिंह पंडित यांच्या कॉर्नर बैठकांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला, ठिकठिकाणी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. विजयसिंह पंडित यांच्या विजयासाठी आपण सर्व कार्यकर्ते एकजुटीने काम करून गेवराई विधानसभा मतदार संघात घड्याळाचा गजर करून विकासपर्वाला सुरु करण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी मतदार भगिनींनी अमरसिंह पंडित यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी ग्रामस्थ, प्रतिष्ठीत नागरीक, मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------

### रमेश आडसकरांच्या रुपात

न्याय देणार असल्याचे सांगितले या वेळी पाठींबा देणाऱ्या जगदीश फरताडे यांनी मनोगत व्यक्त करताना मराठा आरक्षण आंदोलनात आलेले अनुभव विषद करुन या आंदोलना प्रसंगी रमेश आडसकरांनी कसे सहकार्य केले हे सांगितले तसेच माजलगाव मतदारसंघांत होणाऱ्या निवडणूकीत जेवढे उमेदवार आहेत त्या पैकी रमेश आडसकर हे उजवे असून त्यांच्या माध्यमातून मतदारसंघांतील प्रश्न सुटणार आहेत, आज मतदारसंघाला ऊर्जा व कार्यक्षमता असलेल्या उमेदवाराची गरज असून रमेश आडसकरांच्या रुपात माजलगावं मतदारसंघाला धडाडीचा आमदार लाभणार असल्याचेही त्यांनी या प्रसंगी सांगितले.या वेळी राजभाऊ अण्णा बादाडे, सावळाराम उबाळे, गजानन शिंदे, माऊली आगे, बाळकृष्ण शिंदे, भागवत शिंदे, अजय लंगडे, बालासाहेब शेंडगे, अंकुशराव गोंडे, सोनाजी गोंडे, प्रकाश अण्णा झाटे, महादेव आगे, गीतेश आगे, प्रदीप निपटे, सारंग खरात, विजय शेंडगे, डॉ. विशाल शिंदे, पवन साबळे, जनार्दन शिंदे, पांडुरंग पवार, अंगद शिंदे, गोकुळ उबाळे, सचिन मायराणे, बंडू बापू सावंत, प्रदीप निपटे, बबलू मस्के, अमर मस्के, डॉ.विठ्ठल घुगे यांच्या सह शेकडो कार्यकर्त्यांची व नागरिकांची उपस्थिती होती.

----------

### पवार साहेबांच्या सभेला मोठ्या संख्येने

शिवाजी महाराज पुतळ्याजवळ बीड येथे जाहीर सभा घेणार आहेत. या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

**आ.संदीप क्षीरसागर यांनी केली सभा स्थळाची पाहणी**

शुक्रवार दि.८ नोव्हेंबर रोजी सभास्थळी जावून स्वत: पाहणी करून नियोजनाचा आढावा घेतला. सभेचे नियोजनात कसलीही कसर राहणार नाही याची दक्षता स्वत: आ.संदीप क्षीरसागर घेत आहेत.

----------

### बीडच्या सर्वांगीण विकासाठी

काल दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळपासून बीड विधानसभेचे उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी बीड मतदार संघातील चौसाळा जिल्हा परिषद गट पिंजून काढला असून वानगाव, गोगलवाडी, रौळसगाव, खडकी घाट, चांदेगाव, देवीबाभळगाव, जेबापिंप्री, पालसिंगण, हिंगणी खु., हिंगणी बु., रूईगव्हाण / माळेवाडी, मानेवाडी, पिंपळगाव घाट, वाढवणा, चौसाळा या सर्व गावात जाऊन कॉर्नर बैठका घेत ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेतल्या. तसेच त्यांच्याशी मुक्त संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेत त्यांना अनुक्रमांक १३ चिन्ह शिवण यंत्र यावर बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. दरम्यान शहर आणि ग्रामीण भागातील मतदारांनी सुद्धा यंदाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना निवडून देण्याचा निर्धार केला आहे. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांच्यासोबत सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. सर्वच गावात ठीकठिकाणी अनिलदादा जगताप आणि प्रा सुरेश नवले यांचा हृदय सत्कार करून मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

**बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला एकदा संधी द्या- अनिलदादा जगताप**

काल रोजी माजी राज्य मंत्री प्रा सुरेश नवले यांच्यासह बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांनी शहर आणि ग्रामीण भागात कॉर्नर बैठका घेऊन ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेतल्या. यादरम्यान अनिलदादांनी मतदारांना बीडच्या सर्वांगीण विकासाठी मला एकदा संधी द्या. मी आपल्या अपेक्षेप्रमाणे बीडकरांच्या मूलभूत गरजा पूर्ण करून बीडच्या विकासाचा कायापालाट करून दाखवेल फक्त मतदानरुपी मला एकदा आशीर्वाद द्या अशी विनंती करत अहवान केले.

------------

### दहा वर्षांत एकाही विरोधी कार्यकर्त्यांची

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले कि, विरोधकांकडे निवडणुकीत मत मागायला जाताना कुठलेच मुद्दे नाहीत, निवडणुकीच्या तोंडावर नुसते नारळ फोडून खोटी आश्वासने द्यायचे अन निवडणूक संपली की पाच वर्षे मतदारांचे तोंडही बघायचे नाही ही त्यांची जुनीच प्रथा आहे. निवडणुकीत लोकांना दमदाटी करून विजय मिळवता येते नाही तर त्याससाठी काम करावं लागतं असा टोला आ.लक्ष्मण पवार यांनी विरोधकांना लागावला. या निवडणुकीत आपण दहा वर्षात गावागावात केलेल्या विकास कामाच्या जोरावर सामोरे जात आहोत. त्यामुळे गेवराई तालुक्यातील सुज्ञ मतदार आपल्यालाच आशीर्वाद देणार असल्याचे विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. तर मागील दहा वर्षात आपण विरोधी गटातील एकाही कार्यकर्त्याची अडवणूक करून त्यांना त्रास दिला नाही म्हणून आज त्यांच्या रूपाने आपल्या पाठीशी एक मोठी अदृश्य शक्ती उभा असल्याचे आ.लक्ष्मण पवार यांनी सांगितले. त्यांच्या प्रचार दौऱ्याला ग्रामीण भागात मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युनुस पठाण, संदिप कु-हाडे, विनोद गोर्डे, दत्तात्रय पवार, भरत खराद, विनोद खराद, मधुकर खराद, पंकज गंगाधर, भगवान दुधसागर, बबलु गरड, दिपक औटे, रणजीत औटी, भास्कर गंगाधर, महादेव गंगाधर, मधुकर गंगाधर, महादेव गंगाधर, काकासाहेब काकडे महाराज, माऊली जाधव, किशोर जाधव, मोहन काका जाधव, भरत जाधव, दादासाहेब जाधव, रावण जाधव, शिवाजी कोकाटे, शिवाजी जाधव, अनिल जाधव, सत्यजित जाधव, विनायक जाधव, जिजा नलावडे, अनिल लिबोरे, नारायण सुपेकर, आय्युब शेख, रवी जाधव,

---------

### मोदी-शाह यांचा प्रयत्न

संस्कृती आहे. जाती जातीत भांडणे लावण्याचे पाप भारतीय जनता पक्षाने केले असून नरेंद्र मोदींनी त्याचे खापर काँग्रेसवर फोडू नये. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र भूमीत जाती धर्माच्या नावावर माथी भडकावून राजकीय पोळी भाजण्याचा मोदी-शाह यांचा प्रयत्न महाराष्ट्रातील जनता खपवून घेणार नाही, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. भाजपाचा समाचार घेताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, राहुल गांधी हे लोकशाही व संविधान वाचवण्याची लढाई लढत असताना त्यांची खिल्ली उडवण्याचा प्रकार हा संविधानाचा अपमान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा व संविधानाचा अपमान भारतीय जनता पक्षाने सातत्याने केला आहे. लोकशाही व संविधान वाचवणाऱ्या लोकांना नक्षलवादी ठरवण्याचे पाप भाजपाने केले आहे. काँग्रेसने जाती जातीत भांडणे लावली, ओबीसींतील जातीत भांडणे लावली ओबीसींना आरक्षण दिले नाही या नरेंद्र मोदींच्या आरोपाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, ओबीसींना आरक्षण देणाऱ्या मंडल आयोगाला भारतीय जनता पक्षानेच तीव्र विरोध केला होता, हे देशातील जनतेला माहित आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण भाजपानेच घालवले. महाराष्ट्रात आरक्षणाच्या नावाखाली मराठा, ओबीसी, धनगर, आदिवासी, हलबा समाजामध्ये भांडणे लावण्याचे पाप भाजपानेच केले आहे. सरकारी कंपन्या विकून नोकऱ्यातील आरक्षण संपवण्याचे पाप भाजपानेच केले आहे. युपीएससीची परीक्षा न घेता आरएसएसच्या विचारणीच्या तरुणांना थेट संयुक्त सचिव पदावर नियुक्ती देऊन एससी, एसटी, ओबीसी समाजाच्या मुलांना आरक्षणाच्या लाभापासून वंचित ठेवण्याचे पाप मोदी सरकारनेच केले आहे. दोन दिवसांपूर्वीच यवतमाळच्या वणी येथे भाजपच्या एका पदाधिका-याने कुणबी समाजाबद्दल अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केले यावेळी भाजपचे अनेक नेते उपस्थित होते पण कुणीही त्याला थांबवले नाही. ओबीसी समाजाबद्दल नरेंद्र मोदींनी दाखवलेला कळवळा हे फक्त ‘पुतणा मावशीचे प्रेम’, आहे.

----------


## प्रमाणपत्र हरवले आहे

प्रमाणीत करण्यात येते की, अर्जदार नामे किसन सखाराम कोळेकर वय ५५ वर्षे रा.शिंगावाडी ता.शिरुर का जि.बीड हे शिंगारवाडी ते तिंतरवणी असा खाजगी वाहनाने प्रवास करीत असतांना त्यांचे कडील असलेले त्यांचे मालकीचे जॉनडिअर कंपनिचे ट्रॅक्टर ज्याचा पासींग क्रमांक MH-२३-T- २५४४ या ट्रॅक्टरचे आर सी बुक प्रवासा दरम्यान कोठेतरी हरवले बाबतचा अर्ज दिला. आहे. सदरचा अर्ज घेवुन पुढील चौकशी करीत आहोत.

करीता सदरचे प्रमाणपत्र देण्यात येते.

## आष्टी तालुक्यात वाळू उपसा जोरात, राजरोसपणे वाहनातून वाळूची वाहतूक, महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष,मोठी कारवाई करण्याची मागणी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

तालुक्यातील विविध गावांमध्ये अवैधरीत्या वाळूचा साठा करून ठेवला असल्याचे दिसून येत आहे तर तालुक्यात सिना व कडी नदीचे पात्र मोठे असून या नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणावर राजरोसपणे अवैधरीत्या वाळू उपसा होत असून वाकी,चिखली,खडकत,धिर्डी,यासह काही ठिकाणी वाळूचे उत्खनन मोठ्या प्रमाणावर होत आहे.या वाळूचे उत्खनन करून लाखो रुपयांचा महसूल बुडवला जात आहे.याकडे मात्र महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे तर मोठ्या प्रमाणावर होणार्या वाळू तस्करीला लगाम बसणार कधी असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वाळू तस्करी सुरू आहे.महसूल विभागाचे काही तलाठी,मंडळ अधिकारी व पोलीस विभागाचे काही कर्मचारी हातमिळवणी करून याकडे कानाडोळा करत आहेत. महसूल विभाग एखाद दुसरी कारवाई करते थोडाफार दंड वसूल करुन वाहने सोडून देतात. आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी वाळूने भरलेले डंपर, ट्रक्स, ट्रॅक्टर पकडल्या जातात पण त्या वाहनांवर दंड किती केला जातो याची माहिती तहसिल कार्यालयातील जमावं बंदी विभागातून पत्रकारांना वेळोवेळी माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे तालुक्यातील खडकत, सांगवी आष्टी, कडा, हद्दीतून जाणाऱ्या सिना,कडी,बोकडी नदीपात्रात वाळूतस्करांकडून रात्रीच्या वेळी जे.सी.बी, मशीनद्वारे सर्रास वाळूतस्करी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.या होणार्या वाळू तस्करीला लगाम कधी बसणार असा सवाल नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ०९ नोव्हेंबर २०२४



# कुमार आयलानी निवडून आले तरच उल्हासनगरचा सर्वांगीण विकास शक्य - आ. पंकजाताई मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनी गुरुवारी उल्हासनगर टाऊन हॉल येथे उल्हासनगरचे भाजपचे उमेदवार कुमार आयलानी यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेला संबोधित केले. पंकजाताई मुंडे यांच्या दमदार भाषणाने लोकांमध्ये उत्साह व स्फूर्ती निर्माण झाली. या सभेने उल्हासनगरात महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांत चैतन्य निर्माण झाले.



उल्हासनगर येथे आ. पंकजाताई मुंडेंची जोरदार सभा ; महायुतीत चैतन्य !

यावेळी भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार कुमार आयलानी, जीवन इदनानी, प्रमोद हिंदुराव, प्रमोद ताले, प्रदीप रामचंदानी, जमनू पुरस्वानी, मीना आयलानी, महेश सुखरामानी, मनोहर खेमचंदानी, अरुण आशान, किरण सोनवणे, नाना बागुल, प्रमोद ताले, मीना कोरटी, प्रमोद ताले. पाटील, नरेंद्र राजानी, भाऊ गोंधळे,भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय (आठवले), पीआरपी (कवाडे), साई पार्टी आणि लाल पंजाबीसह इतर मित्र पक्षांचे नेते, पदाधिकारी उपस्थित होते. महायुतीच्या या विशाल मेळाव्याला भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी संबोधित केले.

यावेळी पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जेव्हा त्यांचे वडील लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब पहिल्यांदा उल्हासनगरात आले, तेव्हा त्यांनी भाजप सरकार सत्तेवर आल्यावर गुंडगिरीमुक्त शहर निर्माण करण्याचा संकल्प केला होता आणि त्यावर काम केले, त्याची सुरुवात उल्हासनगर पासूनच झाली. मुंडे साहेबांनी कुमार आयलानी यांना भाजपकडून पहिल्यांदा तिकीट दिले होते.नरेंद्र मोदींच्या रूपाने भारताला असा पंतप्रधान लाभला आहे ज्यांनी महिला शक्तीचे उदात्तीकरण केले.२०१४ पासून महिलांच्या स्थितीत बरीच सुधारणा झाली आहे. योजनां सोबतच मोदीजींनी महिलांना सन्मान देण्याचे काम केले आहे. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने राज्यातील जनतेच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना आणल्या आहेत. त्या दिशेने महाराष्ट्रात प्रयत्न सुरू आहेत.

आम्ही पुन्हा सत्तेवर येवू

महायुती सरकारच्या लाडकी बहिण योजनेचा परिणाम समोर दिसतोय की, एवढ्या मोठ्या संख्येने महिला येथे उपस्थित आहेत. त्यांना बळ मिळू लागले आहे. कुमार आयलानी यांनी ही रक्कम वाढवून ३ हजार रुपये करण्याची मागणी केली असून ही मागणीही आगामी काळात पूर्ण होऊ शकते.महिलांना उद्योगातही पुढे यावे यासाठी त्यांच्या सक्षमतेबरोबरच सन्मान वाढविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. आगामी काळात महिलांसाठीही आरक्षण असेल, त्याद्वारे महिला आता मागे राहणार नाहीत.आता पुन्हा एकदा महाराष्ट्रात महायुतीचेच सरकार येणार असून तुम्ही सर्वांनी कुमार आयलानी यांना निवडून दिल्यास सर्व योजना तुमच्यापर्यंत थेट पोहोचू शकतील, त्यामुळे आगामी २० नोव्हेंबर रोजी कमळ चिन्हावरील बटण दाबून कुमार आयलानी यांना प्रचंड मतांनी विजयी करावे. कुमार आयलानी यांच्या विजयाने शहरात शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, महिला सक्षमीकरण अशा सर्व प्रकारचा विकास होणार आहे. विजयाची वज्रमूठ बांधा आणि त्यांना विजयी करा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.

# काँग्रेस पक्षाचे सुरेश यादव हिंगोली, संभाजीनगर पक्ष निरीक्षक व प्रचारक

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्य विकास विभागाचे प्रदेश प्रमुख श्री.सुरेश भगवान यादव यांना आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाकडून महत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष मा.नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशानुसार प्रदेश सरचिटणीस संघटक प्रशासन प्रमोद मोरे यांनी पत्र पाठवले आहेत.मुख्य संयोजिका प्रज्ञा वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली टीमने प्रचार प्रसार कार्य सुरू केले आहे.श्री.सुरेश यादव यांना छत्रपती संभाजीनगर विधानसभेत दौरा करून प्रचार मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



प्रचार दौऱ्यादरम्यान, सुरेश यादव विज्ञान व तंत्रज्ञान कौशल्य विभागासह इतर विभागातील सर्व जिल्हा प्रमुख, ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि सेल विभाग कार्यकर्त्यांसोबत संपर्क साधणार आहेत. विविध बैठका घेऊन काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांसाठी विशेष जनाधार निर्माण करण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील.

सुरेश यादव यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद जिल्हा) विधानसभेतील महाविकास आघाडी उमेदवारांच्या प्रचार मोहिमेत विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत. आगामी निवडणुकीत पक्षाच्या विजयासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू.प्रदेश कार्यालयाने सुरेश यादव यांच्या या कार्याचे कौतुक केले असून हिंगोली निरीक्षक सह अधिकची जवाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. यादव यांना प्रचार कार्यात प्रतिसाद मिळत असून हिंगोली जिल्ह्यात एक दौरा पूर्ण केला आहे. काँग्रेस पक्ष व सेल विभाग कार्यकर्त्यांकडून अभिनंदन केलं जात आहे.

# लुखामसल्यात विजयसिंह पंडितांना धक्का उपसरपंच राजेंद्र व्हरकटे शिवसेनेत दाखल

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदारसंघातील महायुती राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना लुखामसल्यात मोठा धक्का बसला असून, येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान उपसरपंच राजेंद्र व्हरकटे यांनी त्यांना सोडचिठ्ठी देऊन महाविकास आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.



पंडितांची जन्मभूमी आणि कर्मभूमी दैठणला लागून असलेल्या लुखामसला येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विद्यमान उपसरपंच राजेंद्र सरकटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे स्टार प्रचार माजी आमदार अमरसिंह पंडित आणि उमेदवार विजयसिंह पंडित यांना सोडचिठ्ठी देऊन थेट शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करून महाविकास आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित यांच्या विजयासाठी त्यांची मशाल हाती घेतली आहे. तालुक्यात मोठा मित्रपरिवार असलेल्या उपसरपंच राजेंद्र व्हरकटे यांनी आई निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्याने हा महायुतीला मोठा धक्का समजला जात आहे. त्यांचे शिवसेनेत स्वागत करून बोलताना, बदामराव पंडित म्हणाले की, निवडणुकीच्या काळात जो जो मला मदत करेल तो माझ्या आयुष्यात माझा अत्यंत विश्वासू असल्याचे मी समजेल. कारण सत्तेत असताना सगळेच सोबत असतात, परंतु गोरगरिबांच्या हितासाठी निवडणूक लढताना जो सोबत असतो तोच खरा सच्चा मित्र मी समजतो. आज उपसरपंच राजेंद्र व्हरकटे यांनी ग्राम पंचायतच्या सत्तेत असतानाही ती सोडून, मला साथ देण्याचा निर्णय घेतला त्यांना मी कधीही विसरणार नाही. गेवराई तालुक्यातील जनतेला पुन्हा पारतंत्र्यात जाऊ द्यायचं नसेल तर शहरासह ग्रामीण भागातल्या प्रत्येक व्यक्तीने महाविकास आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून मला साथ द्यावी असे आवाहनही बदामराव पंडित यांनी केले. याप्रसंगी माजी सभापती पंढरीनाथ लगड, कानिफनाथ नागरे, युवराज कोकरे, बाळासाहेब काळे, महादेव शिंदे, माऊली नलभे, सय्यद मुसाभाई, बन्सी पौळ, राजाभाऊ भावले, विठ्ठल डोमाळे, बंडू मीरपगार, राजाभाऊ कोकाटे, भाऊसाहेब व्हरकटे, विठ्ठल व्हरकटे, कैलास भिशे, पापा मिया, आसाराम पौळ यांच्यासह शिवसैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# दिवाळी संपली, बसस्थानकामध्ये गर्दी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिपावली सण नुकताच संपला आता परगावी जाण्यासाठी अंबाजोगाई बसस्थानकामध्ये गर्दी दिसून येत असून नौकरीच्या गावी जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे सध्या अंबाजोगाई बसस्थानक गजबजले आहे येथील बसस्थानकाकडून सोलापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, परभणी,हिंगोली या मार्गावर ज्यादा बसेस सोडण्यात आल्याची माहिता आहे



सध्या सर्वत्र परगावी जाण्याचे दिवस आहेत नुकतीच दिवाळी संपली दिवाळी सणानिमित्त घरोघरी नवचैतन्याचे वातावरण होते संपूर्ण दिवाळी साजरी करून आता नोकरदारांना नोकरीवर जाण्याची वेळ आली आहे तसेच उरलेल्या सुट्ट्याचे अनेकांनी नियोजन केले असून धार्मिक स्थळ, पर्यटन स्थळ या ठिकाणी देखील जाण्यासाठी सामान्य जनांची धावपळ आहे राज्य परिवहन महामंडळाने याचीच खबरदारी घेत अनेक ठिकाणी बससेवा सुरू केली आहे असे प्रवाशांनी सांगितले दिवाळीच्या काळात देखील राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस मधून प्रवाशांची संख्या लक्षात घेता अनेक जादा बसेस सोडण्यात आल्या होत्या आता पुन्हा शहराकडून गावाकडे व विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळावर जाण्यासाठी प्रवास करणाऱ्यांना ज्यादा बसेस सोडण्यात आले आहेत अंबाजोगाई बस स्थानकावर दिवाळी सण झाल्यानंतर प्रवाशांची मोठया प्रमाणात गर्दी दिसत आहे.

# माजलगाव विधानसभेतील बहुरंगी लढतीत माझा विजय निश्चित -डॉ.भगवान सरवदे

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभेत सध्या बहुरंगी लढत होत असुन या विधानसभा निवडणुकीत मि गेल्या ३० वर्षापासून करीत आलेल्या अठरापगड जातींच्या केलेल्या कामाच्या जोरावर निवडणूक लढवत त्यामुळे बहुरंगी लढतीत माझा विजय निश्चित असुन एका सामान्य कुटुंबातील सामान्य उमेदवार म्हणून सुज्ञ मतदार मला नक्कीच निवडून देतील असा ठाम विश्वास माजलगाव विधानसभेचे अपक्ष उमेदवार डॉ.भगवानराव सरवदे यांनी दि ०७ नोव्हेंबर गुरुवार रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केला.



**सामान्य कुटुंबातील सामान्य उमेदवाराला मतदार निवडून देतीलच, डॉ.भगवानराव सरवदे यांनी पत्रकार परिषदेत केला विश्वास व्यक्त**

माजलगाव विधानसभेचे अपक्ष उमेदवार डॉ.भगवानराव सरवदे यांनी हॉटेल सुखसागर येथे दि ०७ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.या पत्रकार परिषदेत बोलताना डॉ.भगवानराव सरवदे म्हणाले की,मि वैद्यकीय अधिकारी म्हणून करीत असलेल्या सेवेचा राजीनामा देऊन गेल्या ३० वर्षापासून माजलगाव विधानसभेतील अठरापगड जातीच्या लोकांना बरोबर घेऊन समाजकारण व राजकारणात आहेत.त्यामुळे मि गेल्या ३० वर्षापासून करत असलेल्या आठरा पगड जातीच्या लोकांच्या आडी-आडचणीत केलेल्या कामाच्या जोरावर हि विधानसभा निवडणुक लढवत आहे.सध्या माजलगाव विधानसभा मतदारसंघात बहुरंगी लढत होत असुन या बहुरंगी लढतीत माझा विजय मि निश्चितच समजतोय,एका सामान्य कुटुंबातील सामान्य उमेदवार म्हणून मला मतदारांची पसंती असुन सर्वसामान्य सुज्ञ मतदार मला मतदान करुन मला नक्कीच विजयी करतील असा ठाम विश्वास माजलगाव विधानसभेचे अपक्ष उमेदवार डॉ.भगवानराव सरवदे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केला.या पत्रकार परिषदेला भगवान सेनेचे तालुकाध्यक्ष धर्मराज तांदळे,राजु सरवदे यांची उपस्थिती होती.

डॉ.भगवानराव सरवदे यांना ओबीसी समाजाकडून आर्थिक मदत

माजलगाव विधानसभेतील अपक्ष उमेदवार डॉ भगवानराव सरवदे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मतदार संघातील ओबीसी समाजाकडून गोळा करण्यात आलेली आर्थिक मदत भगवान सेनेचे तालुकाध्यक्ष धर्मराज तांदळे यांनी पत्रकार परिषदेत अपक्ष उमेदवार डॉ भगवानराव सरवदे यांच्याकडे सुपूर्द केली.

पान ६ वरून...

### दलित मतदार विजयसिंह

स्वाभिमानी आहोत अशा आमिषाला दलित समाज भुलणार नाही.यावेळी त्यांच्यासमवेत सोशल मिडीयाचे दिपक निकाळजे, युवा रिपाईचे सोनम कांडेकर यांच्यासह विनोद गायकवाड, विजय हराळे, सुनिल घसिंग, अनिल घसिंग, गौतम सदाफुले, मार्तंड सदाफुले, भगवान सदाफुले, राजीव सदाफुले यांच्यासह रिपाईचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोहनदादा जगताप यांना

चारदरी,पहाडी पारगाव,थेटेगव्हाण या गावातील युवकांनी त्यांच्या दौऱ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांच्या विजयावर शिक्का मोर्तब केले.

बुधवार दि.०६ नोव्हेंबर २०२४ रोजी धारूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोहनदादा जगताप यांचे फटाक्यांच्या व तोफांच्या आतिषबाजी मध्ये मोठ्या जल्लोसात त्यांचे स्वागत केले होऊ घातलेल्या बुधवार दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान केंद्रावर जाऊन वोटिंग मशीन वरील अनुक्रमांक दोन समोरील तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने आपल्याला निवडून आणणार असे युवक मतदारांनी सांगत विजयाची ग्वाही दिली.अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद युवक वर्गातून जगताप यांना मिळत आहे. पहाडी पारगाव येथील मोहनदादा जगताप यांचे प्रचार दौऱ्या दरम्यान युवकांनी गुलाल,हार घालून व महिलांनी औक्षण करून त्यांचे स्वागत केले त्यांच्या सोबत स्टार प्रचारक प्रा.श्रीरामजी मुंडे,संचालक संतोष यादव,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे धारुर तालुकाध्यक्ष युवराज काका लगड,मा.नगराध्यक्ष अर्जुन बप्पा गायकवाड,महोनदादा जगताप मित्रमंडळचे वडवणी तालुकाध्यक्ष बंडूशेठ नाईकवाडे,मित्रमंड धारुर तालुकाध्यक्ष रामदास तिडके,मा.ग्रा.पं.सदस्य गणेश अंडील,मा.ग्रा.पं.सदस्य उद्धव रुद्रे,विलास अंडील,रुक्माअगंद अंडील,उत्तम ढगे,शिवसेना मा.तालुका उपप्रमुख अविनाश अंडील,विलास गवळी,सदाशिव मस्के,सुरेश अंडील,धर्मराज मस्के,आबासाहेब जावळे,अर्जुन मुंडे,सुशेन साक्रुडकर,आदिनाथ अंडील सह महाविकास आघाडीचे नेते,पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच गावातील वयोवृद्ध,ज्येष्ठ,तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मा.महेबुबभाई शेख यांचा

यावेळी आष्टी तालुक्यातील श्री परमेश्वर काका शेळके तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी नेते श्री सुनील दादा नाथ, श्री रवींद्र ढोबळे राष्ट्रीय काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष, श्री संदीप हाडे शिवसेना ता.उपप्रमुख, ज्ञानेश्वर मुटकुळे शिवसेना, श्री विजू गाढवे, राहुल काकडे,शौकत पठाण, रा.काँ.पा.आष्टी तालुका अध्यक्ष अल्पसंख्याक सेल, शिवाजी परभणे पाटील, सतीश चौधरी, ज्ञानेश्वर कासवत यांची प्रमुख उपस्थिती लाभली,दौलावडगावचे मा.सरपंच मेहमूद शेख,ग्राम.पं.सद्स.महादेव कोहक, सागर फसले,आसाराम कोहक, अरबाज खान, जालिंदर मुळे,ग्राम.पं.सदस्य मिरा मामु , गफार पटेल, पापामिया पटेल, मोईन खान,खंडू अप्पा इथापे, दादा टेलर,राजू फसले,नवाब शेठ,शौकत मेजर,जैनूद्दीन मेजर, इक्बाल मेजर , मोहसिन कुरेशी,प्रदीप पिसोरे, सचिन कोहक, रोहिदास आडबल्ले, पत्रकार बंधू जावेद सय्यद आदी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माजलगाव विधानसभा मतदारसंघात

चर्चांना उधाण आले आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघात दलीत-मायक्रो ओबीसी व मुस्लिम समाजाचे मतदान हे निर्णायक असुन या तिन्ही समाजाने ठरवले तर याठिकाणी विधानसभा निवडणुकीत या समाजातीलच उमेदवार निवडून येऊ शकतो,हे समीकरण गृहीत धरुन वंचित आघाडीचे सर्वेसर्वा श्रद्धेय बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांनी माजलगाव विधानसभेसाठी मुस्लीम समाजातीलच मायक्रो ओबीसी असणाऱ्या पिंजारी जातीतीलच उमेदवार या ठिकाणी दिला मात्र वंचीत आघाडीने दिलेला मुस्लीम समाजाचा उमेदवार असतांनाही माजलगाव शहरातील व विधानसभेतील मुस्लीम समाजाने वंचित आघाडीने मुस्लीम समाजाचा दिलेला मुस्लिम उमेदवार मुस्लीम समाजानं स्वीकारला नाही.वंचित आघाडीच्या उमेदवारांने माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शहरासह धारुर व वडवणी तालुक्यात कोणत्याही प्रकारचे स्पिकर व बॅनर असलेले प्रचाराचे वाहान आढळून आलेलं नाही तसेच माजलगाव शहरासह तालुक्यातील कोणत्याही मोठ्या गावात वंचित आघाडीचे चिन्ह असलेले उमेदवाराचे मोक्याच्या ठिकाणी लावलेले बॅनर दिसलेले नाही,हिच परिस्थिती धारुर शहरासह तालुक्यात आहे तर हिच परिस्थिती वडवणी शहरासह तालुक्यातील मोठ्या गावात असल्याने वंचित आघाडीने दिलेला उमेदवाराची कोणत्याही प्रकारची सक्षम प्रचार यंत्रणा माजलगाव,धारुर व वडवणी

पान ६ वरून...

शहरासह तालुक्यात कुठेही दिसत नसल्याने वंचित आघाडीचा असलेला उमेदवार मॅनेज तर झाला नाही ना? अशा वावड्या माजलगाव,धारुर-वडवणी विधानसभा मतदारसंघातील मतदारांत उठत आहेत.

### प्रस्थापितांना वैतागलेला

प्रश्नांसाठी उठविलेला आवाज जनतेला ठाऊक आहे. यामुळे त्यांच्या प्रचाराला सध्या प्रचंड मोठा प्रतिसाद मिळताना दिसतो आहे. शुक्रवारी पूजाताई मोरे यांनी मतदार संघातील टाकळगव्हाण, शिर्डी बुद्रुक, बाबुलतारा, टाकरवण, तपेलिमगाव, दत्तबाग, रामनगर, शेलगाव, रिधोरी, कवडगाव, सुर्डी नजीक, राजेगाव आदी ठिकाणचा दौरा करीत मतदारांच्या भेटी घेतल्या. या सर्वच ठिकाणचे शेतकरी आणि सर्वसामान्यांनी पूजाताई मोरे यांना भरभरून पाठिंबा देताना, आम्हाला बदल घडवायचा असून आम्ही तुमच्याच सोबत आहोत असे आश्वासित केले.

फडावर जात ऊसतोड

कामगारांची घेतली भेट

दौर्या दरम्यान पूजाताई मोरे यांनी उसाच्या फडात काम करीत असलेल्या ऊस कामगारांची भेट घेतली. ऊसतोड कामगारांच्या व्यथा आणि त्यांच्या समस्या यांची जाणीव पूजाताई मोरे यांना चांगल्या प्रकारे आहे. त्यांच्या हक्कासाठी सुद्धा त्यांनी यापूर्वी लढा दिलेला आहे. यावेळी ऊसतोड कामगारांनी पूजाताई मोरे यांचे कौतुकही केले. तुमच्या हक्कासाठी मी सदैव लढत राहणार असून, तुमच्या आरोग्यदायी जीवनासाठी, लेकरांच्या शिक्षणासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे पूजाताई मोरे यांनी यावेळी सांगितले.

### भाजप-राष्ट्रवादीचा सुफडा साफ

असून, आज पर्यंत मी सातत्याने गोरगरिबांची वैयक्तिक कामे करून त्यांची सेवा केली असून, मतदार संघातही वेगवेगळ्या विकास योजना राबविल्या आहेत. त्यासोबत वैयक्तिक विकासाची कामे सुद्धा प्रामाणिकपणे केली आहेत. यापुढेही शेवटच्या श्वासापर्यंत गोरगरिबांची कामे करणार असल्याने यावेळी मला मतदारांनी आशीर्वाद देऊन विधानसभेत पाठवावे असे आवाहन बदामराव पंडित यांनी केले. याचवेळी शिवसेनेचे अनिरुद्ध लोंढे यांनी मतदारांशी संवाद साधताना म्हटले की, राज्यात सत्तेवर आलेले महायुती सरकार हे असंविधानिक होते. या सत्ताधाऱ्यांमध्ये असलेल्या प्रत्येकाने आपल्या नेत्यांशी आणि पक्षाशी गद्दारी तर केली आहे. पण त्यासोबत ज्या तत्त्वाने यांना मतदान केले होते त्या मतदारांशी सुद्धा यांनी गद्दारी केली आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव तर दिला नाहीच, या उलट महागाई मोठ्या प्रमाणावर वाढवून ठेवली आहे. पेट्रोल, डिझेलचे भाव वाढले आहेत. खते, बी-बियाणे यांचेही भाव वाढले आहेत. आज किराणा सामान आणायला गेले तर खटल्याच्या घराला पाच हजार रुपये सुद्धा पुरत नाहीत. मराठा, धनगर, मुस्लिम यांना आरक्षण देऊ म्हणून सांगणाऱ्या या महायुती सरकारने सगळ्यांना झुलवत ठेवले. मराठा विरुद्ध ओबीसी असा वाद लावून आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचे पाप महायुती सरकारने केले आहे. मात्र याला कोणीही बळी पडणार नाही. याउलट भाजपा, शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला राज्यातून हद्दपार करण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत त्यांचा सुफडा साफ केल्याशिवाय मतदार स्वस्थ बसणार नाहीत. गेवराई विधानसभा मतदारसंघातल्या गोरगरिब आणि सामान्य माणसासाठी बदामराव पंडित हा एकमेव आशेचा किरण आहे. जो सगळ्यांच्या मदतीला धावून येतो. अशा प्रामाणिक माणसाला राजकारणात टिकून ठेवण्यासाठी या विधानसभा निवडणुकीत प्रचंड मताने त्यांना विजयी करा असे आवाहनही अनिरुद्ध लोंढे यांनी केले आहे. यावेळी माजी सभापती पंढरीनाथ लगड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महादेव औटी, उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, युवासेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, शिवसेना अल्पसंख्यांक सेल तालुका अध्यक्ष तय्यब पठाण, कैलास राठोड, मिलिंद वाघमारे, राजेंद्र जावळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या

गवारी, रत्नागिरी, ससेवाडी, मोरगाव, दरडवाडा, खंडाळा, मुळूक, मसेवाडी, लिंबोनिष, अंजनवती, महाजनवाडी, पोखरी, पिंपळनेर, बेलगाव, सोमनाथवाडी, देवरेवाडी, सूर्याचीवाडी, भाळवणी, पिंपळवाडी, डोकेवाडा, वाळेकर वाडा, कानेगाव, चराटा, धुमाळवाडी, मेंगडेवाडी, जाधववाडी, गवळवाडी, काळेवाडी, आहेर धानोरा, वरवटी यासह बहुतांश गावात दौरा केला. त्यांच्या दौऱ्यात नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन केलेल्या कामांची माहिती दिली. नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत करून डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठे मताधिक्क्य देणार असल्याचा विश्वास दिला.




# रब्बीसाठी 'डीसीसी' बँकेकडून २०६ कोटींचे पीककर्ज वाटप




**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने (पीडीसीसी) चालू वर्षीच्या रब्बी हंगामातील पिकांसाठी ६८५ कोटी ७३ लाख रुपयांचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यापैकी आत्तापर्यंत २८ हजार ५०१ शेतकऱ्यांना २०६ कोटी ८६ लाख ४२ हजार रुपयांचे पीककर्ज वाटप केले आहे. शेतकऱ्यांना आणखी येत्या ३१ मार्चपर्यंत रब्बी पिकांसाठी कर्जवाटप केले जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना वेळेत रब्बीत पेरण्या करणे शक्य होणार आहे, अशी माहिती बँकेच्या सूत्रांनी दिली.**

यंदा पावसाळ्यात जोरदार पाऊस झाल्यामुळे उशिराने वाफसा येत आहे. त्यातच अनेक ठिकाणी ऊस गाळपास गेल्यानंतर शेतकरी गहू, हरभरा अशा पिकांच्या पेरण्या करतात. परंतु चालू वर्षी उशिराने साखर कारखाने सुरू होत असल्याने गहू, हरभरा पिकांच्या पेरण्या काही प्रमाणात उशिराने होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे रब्बीच्या कर्ज वाटपात फारशी वाढ झालेली नाही. गेल्या वर्षी याच काळात २६९ कोटी ४७ लाख रुपये म्हणजेच ४५ टक्के पीककर्ज वाटप झाले होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी काही प्रमाणात कर्ज कमी वाटप झाले आहे. परंतु येत्या काळात कर्ज वाटपात वाढ होण्याची शक्यता आहे. यंदाही पुणे जिल्हा सहकारी बँक तालुका व महत्त्वाच्या गावपातळीवर असलेल्या ३०० शाखांमार्फत गावपातळीवरील सुमारे १३०६ विविध कार्यकारी सहकारी सोसायटींना कर्जपुरवठा करून तो कर्जरूपाने सभासदांना देतात. सध्या बँकेकडून तीन लाखापर्यंत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याज दराने पीककर्जाचे वाटप केले जात आहे. तर, तीन लाखांहून अधिक पीककर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना अकरा टक्के दराने वाटप करत आहेत. त्यामुळे रब्बीसाठी पीककर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत आहे. जिल्ह्यातील रब्बी हंगामातील पिकांसाठी जिल्हा बँकेने ६८५ कोटी ७३ लाख रुपयांचे पीककर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये पूरक व्यवसायासाठी अल्प मुदतीचे ४ कोटी ५० लाख रुपयांचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट यंदाचा रब्बी हंगाम संपेपर्यंत आहे, अशी माहिती बँकेच्या सूत्रांनी दिली.

### विविध पिकांना दिले जाते कर्ज

रब्बी पिकांव्यतिरिक्त बँकेकडून ऊस, टोमॅटो, कांदा, बटाटा, केळी, द्राक्ष, डाळिंब, आंबा, गुलाब, जरबेरा, ढोबळी मिरची, भात, भूईमूग अशा अनेक पिकांना पीक कर्जाचे वाटप केले जात आहे. त्यामुळे दर वर्षी पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. जिल्ह्यात रब्बी हंगामात आंबेगाव, बारामती, भोर, दौंड, हवेली, इंदापूर, जुन्नर, शिरूर, पुरंदर या तालुक्यांत पीककर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे. बँकेकडून रब्बी हंगामात हरभरा, गहू, ज्वारी, करडई अशी विविध पिकांची पेरणी शेतकरी करतात. परंतु या पिकांची पेरणी करताना लागणाऱ्या निविष्ठा खरेदीसाठी काही वेळेस शेतकऱ्यांना अडचणी येतात. त्यामुळे बहुतांशी शेतकरी पीक कर्जाचा आधार घेऊन खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामाचे नियोजन करून पिके घेतात.

## पिकांमध्ये गंधक कमी पडल्यास जाणून घ्या कोणत्या पिकावर काय परिणाम होतो

गंधकामुळे तेलबियाणे पिकांमध्ये तेलाचे प्रमाण तसेच उत्पादनात वाढ होते. शेंगवर्गीय पिकामध्ये जैविक नत्र स्थिर करण्यासाठी गंधकाची मदत होते. उदा. सोयाबीनमध्ये गंधकाच्या उपयोगाने शेंगांच्या संख्येत व त्यांच्या वजनात वाढ होते. गंधकामुळे कडधान्य पिकांची प्रतीमध्ये वाढ होते. उसामध्ये साखरेचे प्रमाण वाढते. जिप्सम मध्ये गंधकाचे प्रमाण हे सर्वात जास्त असते. साधारणतः १३% ते २७% एवढे असते. तसेच जिप्सम मध्ये कॅल्शियम सल्फेट ६५% ते ७०%, कॅल्शिअम- १४% ते १६%, सल्फर १४% ते २०% एवढे आहे.

विविध पिकांवर असा होतो परिणाम :

केळी : १) केळीची नवीन पाने गोलाकार न होता पिवळसर पांढरी होतात.

२) झाडांची वाढ खुंटते व लहान फळे तयार होतात व पाने पिवळी पडतात.

वांगी : १) गंधकाची कमतरता असल्यामुळे झाडांची अपरिपक्क फुले गळतात, उत्पादनात घट होते.

कोबी : १) कमतरतेमुळे नवीन पानाचे काठ पिवळे पडतात. २) नवीन पानांचा आकार चमच्याच्या किंवा कपासारखे होऊन निमुळता होत जातो. त्यामुळे गड्डा तयार होत नाही.

फ्लॉवर : १) फुलकोबी गंधकाच्या कमतरतेची अतिशय संवेदनशील आहे.

२) लागवडीपासून एक महिन्याच्या आत पानाच्या कडा पिवळसर पडून खाली निमुळत्या होतात. ३) गंधकाच्या कमतरतेमुळे उत्पादनात घट होते.

हरभरा : १) पानांची टोके पिवळसर हिरव्या रंगाची होतात. कमतरतेमुळे पानाला लाल रंग येतो. २) नवीन अपरिपक्क पाने वाळतात व झाडांच्या शाखा व्ही आकाराच्या होतात.

मिरची : १) गंधकाच्या कमतरता असल्यामुळे झाडांना फुलधारणा उशिरा होऊन फुलांच्या संख्या कमी होते व उत्पादनात घट होते. २) नवीन कोवळ्या पानांच्या शेंड्यावर पिवळसर ठिपके दिसून येतात.



कापूस : १) जुन्या पानांवर गंधकाची कमतरता लवकर दिसून येते. नवीन पाने पिवळी पात्याचा रंग लालसर दिसतो.

भुईमूग : १) गंधकाची कमतरता असल्यामुळे सर्वसाधारण झाडापेक्षा लहान झालेले आढळतात. २) शेंगा व नत्रासाठी यांची वाढ खुंटते व परिपक्क होण्यास वेळ लागतो.

मका : १) नवीन पानांच्या शिरा पिवळ्या पडतात व पानांच्या कडा लालसर दिसतात. २) पानांची कडा लालसर होऊन खोड खालच्या बाजूने लालसर होताना पिवळी पडतात.

कांदा : १) गंधकाचे प्रमाण कमी झाल्यास पानाचा आकार लहान होतो. पाने पिवळी पडतात. २) पानांची शेंडे पिवळसर पडून वाळतात.

तांदूळ : १) पाने पिवळसर होतात. २) झाडांची वाढ खुंटते व लोंब्यांच्या संख्येत घट होते. ज्वारी : १) झाडांची जुनी पाने पिवळसर हिरव्या रंगाची होतात. जुनी पाने हिरवीच राहतात. २) झाडांची नवीन पाने लहान होऊन निमुळतात.

सोयाबीन : १) नवीन पाने हिरवट पिवळसर होतात व पानांची लोळी कमी होते. २) गंधकाची जास्त कमतरता असल्यास पूर्ण झाड पिवळे होऊन परिपक्क होण्यापूर्वी ते गळून जातात. फुले कमी होऊन फळधारणा कमी होते.

ऊस : १) नवीन पानांवर पिवळसर हिरवा रंग येतो. २) गंधकाची कमतरता असल्यास पूर्ण पान पांढरे होतात व वाढतात.

गहू : १) सर्वसाधारण पूर्ण झाड पिवळे पडते. २) गंधकाच्या कमतरतेमुळे झाडांची वाढ खुंटते. लोंब्या धरण्याचे प्रमाण कमी होते व फुले कमी दाणे भरण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होतो.

## गोचीड नियंत्रणासाठी उपयुक्त असलेल्या औषधी वनस्पती

वेखंड : वेखंड अथवा वचा या नावाने ओळखली जाणारी वनस्पती आहे. चेतना संस्थेच्या आजारात ही वनस्पती वापरली जाते. या वनस्पतीची पावडर उवा, गोचीड यांसारख्या बाह्य कृमींच्या नियंत्रणासाठी वापरावी. ही पावडर जनावरांच्या शरीरावर लावत असताना, केसांच्या उलट दिशेने लावावी, म्हणजे ती केसांच्या मुळांपर्यंत (त्वचेपर्यंत) पोचते.

कडुनिंब : कडुनिंब तेल हे बाह्य परोपजीवींच्या नियंत्रणासाठी अत्यंत गुणकारी आहे. हे तेल जनावरांच्या शरीरावर लावावे. यास असणारा उग्र वास आणि चव यामुळे बाह्य परोपजीवींची भूक नष्ट होते. त्यामुळे ते मरतात.

करंज : कडुनिंब तेलाप्रमाणेच करंज तेलामध्ये कीटकनाशक गुणधर्म आहेत. या तेलाचा वापर जनावराच्या शरीरावर लावण्याकरिता करावा. यामुळे बाह्य परोपजीवी मरतात.

सीताफळ : सीताफळाची पाने व बी हे चांगले कीटकनाशक आहे. सीताफळाची पाने सावलीत वाळवून याची पावडर करावी किंवा बियांची बारीक पावडर करावी. पावडर जनावरांच्या शरीरावर केसांच्या उलट दिशेने लावावी.

बावनचा : बावनचा किंवा बावची या वनस्पतीचे तेल कीटकनाशक म्हणून जनावरांच्या शरीरावर लावावे. यामुळे हे कीटक मरतात.



कण्हेर : फुलांसाठी प्रसिद्ध असलेली ही वनस्पती. हिची पाने अथवा मूळ परोपजीवींच्या विरोधात अत्यंत गुणकारी आहे. याचा वापर जनावराच्या शरीरावर बाहेरून लावण्याकरिता करावा.

सिट्रोनेल्ला : सिट्रोनेल्ला गवताचा उग्र वास असतो. सिट्रोनेल्ला, जिरॅनियम या तेलांचा वापर केल्याने बाह्य परोपजीवी जनावराच्या शरीरापासून दूर जातात. निलगिरी तेल : निलगिरी तेलाचा वापर अत्यंत उपयुक्त आहे. या तेलामुळे बाह्य परोपजीवी जनावरांच्या शरीरापासून दूर जातात. तसेच काही बाह्य परोपजीवी मरतात.

वनस्पतींचा एकत्रित वापर

वेखंड १५ ग्रॅम, सीताफळ (बी व पाने) १० ग्रॅम, कण्हेर (मूळ व पाने) ५ ग्रॅम.

अर्क तयार करण्याची पद्धत

या सर्व वनस्पती १५० ते २०० मि.लि. पाणी मिसळून उकळाव्यात. पाणी साधारणतः ४० ते ५० मि.लि.पर्यंत होईल तोपर्यंत उकळावे. नंतर हा अर्क गाळावा.चोथा वेगळा करावा. या गाळलेल्या अर्कामध्ये कडुनिंब तेल ५० मि.लि., करंज तेल ५० मि.लि., सिट्रोनेला तेल ५ मि.लि., जिरॅनियम तेल ५ मि.लि., निलगिरी तेल ५ मि.लि. या प्रमाणात मिसळावे. या मिश्रणातून ३० मि.लि. मिश्रण वेगळे घेऊन ते एक लिटर पाण्यात मिसळावे. या द्रावणात ५० ग्रॅम साबणाचा चुरा मिसळावा. हे मिश्रण जनावरांच्या अंगावर फवारावे. यामुळे बाह्य परोपजीवी मरतात. जनावरांमध्ये माईटमुळे खरुज हा त्वचाविकार होतो. या माईटच्या नियंत्रणासाठी हे मिश्रण उपयोगी आहे.

## बियाणे कम खत यंत्राद्वारे बियाणे पेरणीसोबतच खतही टाका

कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरण झपाट्याने वाढत आहे. शेतीच्या मशागतीच्या तयारीपासून पीक काढणीपर्यंतचे काम यंत्राच्या साहाय्याने केले जाते. कृषी यंत्रांच्या किंवा कृषी अवजारांच्या मालिकेत, एक मशीन आहे जे शेतात बियाणे पेरण्याबरोबरच जमिनीत खत मिसळण्याचे काम करते. हे यंत्र एकाच वेळी दोन कामे करते जेणेकरून शेतकऱ्याला स्वतंत्रपणे खत टाकण्याचे काम करावे लागणार नाही. या मशिनमध्ये बियाणे आणि खते एकत्र पडतात, त्यामुळे बियाणे पेरण्याबरोबरच खत टाकण्याचे काम केले जाते. सीड कम फर्टिलायझर ड्रिल मशीन असे या यंत्राचे नाव असून याला बियाणे कम खत यंत्र असेही म्हणतात. विशेष बाब म्हणजे या यंत्रावर शासनाकडून कृषी यंत्र प्रशिक्षण योजनेंतर्गत अनुदानही दिले जाते.

खत ड्रिल मशीन म्हणजे काय?




खत ड्रिल मशिन किंवा बियाणे कम खत यंत्राचा शेतकरी गरजेनुसार वापर करू शकतात. बियाणे जमिनीत पेरणे, ते एकसमान मिसळणे आणि विशिष्ट खोलीवर पेरणे हे त्याचे मुख्य कार्य आहे. याशिवाय रासायनिक आणि सेंद्रिय खते जमिनीत मिसळण्यासाठी सुद्धा या यंत्राचा वापर केला जातो. अशाप्रकारे या मशिनच्या साहाय्याने दोन कामे एकाच वेळी केल्याने तुमचा वेळ आणि श्रम तसेच पैशाची बचत होऊ शकते. हे यंत्र ट्रॅक्टरला जोडून चालवले जाते.

**खत ड्रिल मशीनने ही पिके पेरली जाऊ शकतात :**

खत ड्रिल मशिनने अनेक प्रकारच्या पिकांची पेरणी करता येते. परंतु प्रामुख्याने शेतकरी गहू, मका, बाजरी, तेलबिया, कडधान्ये, सोयाबीन इत्यादी पिकांची पेरणी करू शकतात.

खत ड्रिल मशीन वापरण्याचे फायदे

**बियाणे पेरणीचे काम खत ड्रिल मशिनच्या साहाय्याने सहज करता येते.**

या यंत्राच्या वापराने बियाणे शेतात विखुरले जात नाही. बिया टाकण्याबरोबरच त्यांना मातीने झाकण्याचे कामही या यंत्राद्वारे केले जाते. हे यंत्र ठराविक अंतर आणि खोलीवर बिया पेरण्याचे काम करते, त्यामुळे बियाणे समान अंतर आणि खोलीवर पेरले जाते. या यंत्राद्वारे जमिनीत खतेसुद्धा टाकता येतात. या यंत्राच्या वापराने बियाण्यांची उगवण क्षमता वाढून पीक उत्पादन चांगले मिळते. शिवाय या यंत्राच्या साहाय्याने संपूर्ण शेतात खते मिसळली जाते, त्यामुळे तणांचे नियंत्रण करणे सोपे जाते. कोरडवाहू जमिनीसाठी खत ड्रिल मशीनचा वापर अधिक फायदेशीर मानला जातो.

**फर्टिलायझर ड्रिल मशीन/सीड कम खत यंत्राची किंमत :**

अनेक कंपन्यांचे फर्टिलायझर ड्रिल मशीन/सीड कम फर्टिलायझर मशीन बाजारात उपलब्ध आहे. ज्यामध्ये महिंद्रा सीड कम फर्टिलायझर मशीन, खेडूत सीड कम फर्टिलायझर मशीन, जॉन डियर फर्टिलायझर ड्रिल मशीन, दशमेश ९११ सीड कम फर्टिलायझर ड्रिल मशीन ही खूप लोकप्रिय मशीन आहेत. फर्टिलायझर ड्रिल मशिन/सीड कम खत यंत्राची किंमत रू. २०,००० ते १.२० लाखापर्यंत आहे.




### महत्वाच्या घटना

१६५९ : शिवाजी महाराजांनी प्रतापगड येथे अफझलखानाचा वध केला. त्यावेळी अफझलखान 'दगा ऽऽऽ दगा ऽऽऽ ' असे ओरडला.
१६९८ : ईस्ट इंडिया कंपनीने कलकत्ता बंदर स्थानिक राजाकडून विकत घेतले
१८८५ : गोटलिएब डीमेलर ने आजच्याच दिवशी जगातील पहिली मोटर सायकल जगासमोर ठेवली होती.
१९५० : अमेरिकेचे लेखक विलियम फोक्नर यांना साहित्याकरिता नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.
१९५८ : गुजरातमध्ये बडोद्याजवळ वेदसार येथे प्रायोगिक विहिरीमध्ये तेल सापडले.
१९६० : नागविदर्भ चळवळीच्या आदेशावरून नागपुरात हरताळ, घाऊक व्यापार, दुकाने, हॉटेले बंद.
१९८३ : बिल गेट्स यांनी विंडोज १.० प्रकाशित केले.
१९८९ : जर्मनी या देशात बर्लिन ची भिंत पाडण्याचे कार्य आजच्याच दिवशी सुरु करण्यात आले होते.
१९९० : भारताचे ८ वे पंतप्रधान म्हणून चंद्रशेखर यांनी सूत्रे हाती घेतली.
१९९५ : नायजेरिया या देशात पर्यावरण प्रेमी कार्यकर्ता व नाट्यकार केन सारो विवो यांना आठ लोकां समवेत तेथील सरकारने आजच्याच दिवशी फासीवर चढविले होते.
१९९७ : आजच्याच दिवशी चीन व रशिया या दोन देशादरम्यान घोषणा पत्र कराराद्वारे सीमा विवाद संपुष्टात आला होता.
१९९९ : शास्त्रीय संगीतातील बहुमोल कामगिरीबद्दल मध्य प्रदेश सरकारतर्फे दिला जाणारा 'तानसेन सन्मान' गायक पं. सी. आर. व्यास यांना जाहीर
२००० : गंगा मेकांग संपर्क परियोजनेचे कार्यास सुरुवात आजच्याच दिवशी करण्यात आले होते.
२००१ : ज्येष्ठ अणूशास्त्रज्ञ आणि आणूऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. आर चिदंबरम यांची केन्द्र सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार म्हणून निवड
२००४ : झेंगझोऊ हे चीनचे सर्वात प्राचीन आठवे शहर म्हणून घोषित करण्यात आले होते.
२००६ : तामिळ वंशाचे श्रीलंकेतील संसद सदस्य नादराजा रविराज यांची कोलंबो येथे हत्या
२००८ : भारतीय क्रिकेट संघाने आजच्याच दिवशी ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाचा पराभव करीत बॉर्डर गावस्कर चषक २-० ने जिंकला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५० : म्हैसूर राज्याचा शासक टिपू सुलतान याचा जन्म झाला होता.
१८१० : फ्लश शौचालय चे निर्माते जॉर्ज जेनिंग्स यांचा जन्म. (मृत्यू: १७ एप्रिल १८८२)
१८४८ : सुरेंद्रनाथ बॅनर्जी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक आणि त्यातील जहाल गटाचे नेते, 'राष्ट्रगुरू' (मृत्यू: ६ ऑगस्ट १९२५)
१८५१ : फ्रान्सिस बाल्फोर प्राण्यांच्या वर्गीकरणाविषयी मूलभूत संशोधन करणारे ब्रिटीश निसर्ग शास्त्रज्ञ (मृत्यू: १९ जुलै १८८२)
१९०४ : कुसुमावती आत्माराम देशपांडे साहित्यिक व समीक्षक, ग्वाल्हेर येथील ४३ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९६१)
१९०९ : अमेरिका येथील गीतकार व संगीतकार जॉनी मार्क्स यांचा जन्म झाला होता.
१९१९ : एके ४७ बंदुकीचे निर्माते मिखाईल कलाशनिको यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर २०१३)
१९२५ : रिचर्ड बर्टन अभिनेता (मृत्यू: ५ ऑगस्ट १९८४)
१९४४ : किर्गिस्तान देशाचे पहिले अध्यक्ष असगर अकयेव यांचा जन्म.
१९५२ : सुनंदा बलरामन ऊर्फ सानिया लेखिका
१९६४ : हिंदी चित्रपट अभिनेते आशुतोष राणा यांचा जन्म.
२०१३ : भारतीय लेखक विजयदन देठा यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १९२६)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२४० : प्रसिध्द अरबी सुफी कवी इबने अरबी यांचा मृत्यू झाला.
१६५९ : अफझल खान आदिलशहाचा सेनापती (जन्म:)
१९०८ : भारतीय स्वतंत्रता सेनानी कनाईलाल दत्त यांचे निधन झाले.
१९२० : दत्तोपंत ठेंगडी स्वदेशी जागरण मंच, भारतीय मजदूर संघ व भारतीय कामगार संघ यांचे संस्थापक (जन्म: १४ आक्टोबर २००४)
१९२२ : शिवकालीन जंत्रीचे कर्ते, गणितज्ञ व ज्योतिर्विद गणेश सखाराम खरे यांचे पुणे येथे निधन.
१९३१ : प्रसिध्द हिंदी साहित्यकार गंगाप्रसाद अग्निहोत्री यांचे निधन झाले.
१९३८ : मुस्तफा कमाल अतातुर्क तुर्कस्तानचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १९ मे १८८१)
१९४१ : लक्ष्मण रामचंद्र पांगारकर संतसाहित्याचे अभ्यासक, चरित्रकार व गाथा संपादक (जन्म: ३१ जुलै १८७२)
१९८२ : लिओनिद ब्रेझनेव्ह रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस (जन्म: १९ डिसेंबर १९०६)
१९७० : फ्रांस चे पूर्व राष्ट्रपती चार्ल्स द ग्वाल यांचा मृत्यू झाला.
१९९५ : प्रसिध्द शायर फजल ताबिश यांचे निधन झाले.
१९९६ : माणिक वर्मा शास्त्रीय संगीत व सुगम संगीत या दोन्ही क्षेत्रांत लोकप्रियता मिळवलेल्या गायिका. 'वंदे मातरम', 'सीता स्वयंवर', 'मायाबाजार', 'गुळाचा गणपती', 'पुढचं पाऊल' या चित्रपटांसाठीही त्यांनी पार्श्वगायन केले. 'वाजई पावा गोविंद', 'त्या चित्तचोरट्याला', 'अमृताहुनी गोड' इ. त्यांची अनेक गीते लोकप्रिय आहेत. (१६ मे १९२६)
२००३ : झिम्बाब्वे देशाचे पहिले अध्यक्ष कन्नान बनान यांचे निधन. (जन्म: ५ मार्च १९३६)
२००९ : सिंपल कपाडिया अभिनेत्री आणि वेशभूषाकार (जन्म: १५ ऑगस्ट १९५८)

# राजकिशोर मोदी व त्यांचा सहकाऱ्यांचा महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज मतदार संघातील जनमानसाच्या भावनांचा आदर व विचार करून अबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी त्याच्या अनेक सहकारी व कार्यकर्त्यांसह केज मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांना जाहिर पाठिंबा दिला आहे. राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांची बुधवार दि. ६ नोव्हेंबर रोजी आद्यकवी मुकुदराज सांस्कृतिक सभागृहात संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राजकिशोर मोदी यांच्यावर प्रेम करणारे दीड ते दोन हजार कार्यकर्ते सहभागी झाले होते. या वेळी बैठकीतील बहुतांश कार्यकर्त्यांनी पृथ्वीराज साठे याना साथ देवून त्याना प्रचंड बहुतमानी विजयी करण्याचा निश्चय केला. या संवाद बैठकीत राजकिशोर मोदी यांच्या सह दत्ता आबा पाटील, प्रा वसंत चव्हाण, रिकबचंद सोळंकी, बबन लोमटे, प्रकाश सोळकी, ॲड विष्णुपंत सोळंके,मनोज लखेरा, चंद्रशेखर वडमारे,महादेव आदमाने , दिनेश भराडीया , धम्मा सरवदे, संकेत मोदी, किशोर परदेशी, डॉ राजेश इंगोले, राजेंद्र मोरे, सुनील वाघाळकर,असद भाई, अशोक मोदी, हाजी खालेक ,अंकुश हेडे, परमेश्वर वाकडे, गोविंद पोतंगले , अशोक गंडले, अकबर पठाण,शाकेर काझी, महेश कदम, दत्ता सरवदे, मोईन शेख, भाई वजीर शेख, रफिक गवळी यांच्यासह असंख्य सहकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या कार्यकर्ता संवाद बैठकीचे प्रस्ताविक माजी नगरसेवक महादेव आदमाणे यांनी केले. ही एक कौटुंबिक बैठक असल्याचे सांगत समाज किंवा मतदार कोणत्या विचाराचा आहे हे जानण्यासाठी ही बैठक घेण्यात आली असल्याचे महादेव आदमाणे यांनी सांगितले. जातीवादी लोकांसोबत जायचे की निरपेक्ष भावनेच्या लोकांसोबत थांबायचे याबाबत ही बैठक आयोजित केली असल्याचे





## मतदार संघातील जनमानसाच्या भावनांचा आदर व विचार करून पृथ्वीराज साठे यांचा विजयश्री खेचून आणणार- राजकिशोर मोदी

देखील त्यांनी याप्रसंगी नमूद केले. आंबासहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष दत्ता पाटील यांनी राजकिशोर मोदी जो निर्णय घेतील त्यास आपला संपूर्ण पाठिंबा असेल असे स्पष्ट केले. यावेळी डॉ राजेश इंगोले यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. आपल्या शेरोशायरीच्या माध्यमातून त्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. त्यांनी विद्यमान आमदार यांच्यावर अप्रत्यक्ष पणे बोलताना तुमच्याकडे कसलेही कुलूप असले तरी चावी मात्र राजकिशोर मोदी व त्यांच्या असंख्य सहकाऱ्यांकडे असल्याचे सांगितले. विकास म्हणजे केवळ रस्ते करणे नाल्या करणे हा नाही तर येथील सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळण्यासाठी मोठे उद्योग क्षेत्र सुरू करणे , त्याचे दरडोई उत्पन्न वाढवीने अशा बाबींवर विकास अवलंबून असल्याचे डॉ राजेश इंगोले यांनी स्पस्ट केले.

सदरील बैठकीत हाजी खालेक ,अकबर पठाण, ॲड दयानंद लोंढाळ, मुख्याध्यापक बळीराम जोगदंड, परमेश्वर वाकडे, किशोर परदेशी, ॲड विष्णुपंत सोळंकी, चंद्रशेखर वडमारे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. राजू मोरे यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले की स्वतः च्या विकासापेक्षा कार्यकर्त्यांचा विकासाला महत्व देणारा नेता असला पाहिजे . राजकिशोर मोदी ठरवतील तीच दिशा व त्याच दिशेने आम्ही वाटचाल करू अशी ग्वाही याप्रसंगी सर्वांच्या वतीने दिली. माजी नगरसेवक बबन लोमटे यांनीदेखील याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले. राजकिशोर मोदी व आम्ही शरीराने जरी महायुतीत असलो तरीही मनाने एक विचाराचे असल्याचे यावेळी बोलून दाखवले. एकाच कुटुंबाचे मतदार संघात झालेले अतिक्रमण दूर करण्यासाठी या संवाद बैठकीत आपला विचार ठरवायचा असून तो सर्वांनी मिळून एकदिलाने ठरवूनार असल्याचे नमूद केले.ही निवडणूक ही धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी झाल्याचे बबन लोमटे यांनी सांगितले. सत्तेचा माज उतरवायचा असेल तर साठे सारख्या सामान्य माणसाला निवडणूक देण्याची साद यावेळी त्यांनी घातली.

आपल्या विस्तृत भाषणात राजकिशोर मोदी यांनी केज मतदारसंघात कुणाला मतदान करायचे याबाबत ही कार्यकर्ता बैठक आयोजित केली असल्याचे सांगितले. अंबाजोगाई शहर हे अठरा पगड जातीचे धर्मनिरपेक्ष असे शहर असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यमान आमदार यांच्या नातेवाईकबद्दल बोलताना त्यांचा मतदार संघातील प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दहशत पसरवली असून ते सर्वजण दहशतिखाली काम करत असल्याचे नमूद केले. सामान्य मतदाराला वेढीस धरण्याचे काम ते करत असून माणूस बघून कोणतेही काम करत असल्याचे सांगितले. मग ज्यामध्ये डी पी असो, पोलीस स्टेशन मध्ये तक्रार नोंदवने,असो किंवा दवाखान्यात रुग्णास दाखल करण्याचा प्रश्न असो त्यांचा फोन गेला तरच पुढील काम होते अन्यथा नाही अशी दहशत आमदाराचे नातेवाईक यांनी निर्माण केली असल्याने सामान्य माणूस यामध्ये भरडल्या जात असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी सांगितले. त्यांनी गेली कित्येक वर्ष एकच गुत्तेदार पोसण्याचे काम केले आहे. विद्यमान आमदार यांनी केलेला तथाकथित विकास हा विकास नसून ती एक सूज असल्याचे राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. अंबाजोगाई नगर परिषदेवर १५० कोटींचा बोजा चढविण्याचे पातक आमदारांनी केले असून त्याची परफेड ही सामान्य माणूस भरत असलेल्या टॅक्स मधून केली जाणार असल्याचे सांगून अशा पातकी व घातकी आमदार व त्यांच्या नातेवाईकांना पुनः सत्तेपासून दूर ठेवण्याचे काम येणाऱ्या २० नोव्हेंबर रोजी साठे याना मतदान करून करण्याचे आवाहन राजकिशोर मोदी यानी उपस्थित जनसमुदायास केले. केवळ शहरातीलच नव्हे तर संपूर्ण केज मतदार संघातील त्यांचा दहशतवाद थांबवण्यासाठी एक सामान्य माणूस पृथ्वीराज साठे यांना भरघोस मतदानरुपी आशीर्वाद देऊन निवडून द्यावे असेही आवाहन राजकिशोर मोदी यांनी या कार्यकर्ता संवाद बैठकीत उपस्थित सर्व मतदार बांधवास केले.या बैठकीत अंबाजोगाई शहरातील विविध समविचारी पक्षाचे नेते, कार्यकर्ते व मतदार मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

# गुंडगिरी कोण करतो हे सर्वांना ठाऊक माझा परिवार माळकरी-अर्जुन खोतकर

जालना । प्रतिनिधी

गुंडगिरी आणि दडपशाही कोण करतो हे जालनेकारांना ठाऊक आहे. खोतकर परिवार हा निर्व्यसनी, माळकरी आणि वारकरी आहे. पंढरपूरच्या आषाढी वारीची आमच्या कुटुंबाची नियमित परंपरा आहे. ज्यांचा दिवस दुपारी १२ ला सुरू होतो आणि रात्र संध्याकाळी ०६ वाजता त्यांनी आमच्या बदनामीचा कितीही प्रयत्न केला तरी त्याचा काहीच परिणाम होणार नाही, असा टोला माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी लगावला. दिनांक ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी उमेदवार खोतकर यांनी राममूर्ती ,मजरेवाडी ,शिंधी काळेगाव, साळेगाव घारे,सोमनाथ ,जळगाव तांडा, पिरकल्याण कल्याण सीड इत्यादी ग्रामीण भागातील गावाचा दौरा



केला. त्यावेळी प्रचार सभेमध्ये बोलताना व मार्गदर्शन करताना खोतकर यांनी सांगितले .या प्रसंगी शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर, सह संपर्कप्रमुख फिरोज लाला तांबोळी, कैलास गिराम , सुधाकरराव गिराम, निवृत्ती मुळे, रहीमभाई चौधरी, गब्बर चौधरी, साळुराम गिराम, तुकाराम खर्जुले, संदीप घारे, आप्पासाहेब, आरेकर तुकाराम तुकाराम महाराज गुलगे , अशोक चव्हाण, विठ्ठल एखंडे ,राम एखंडे, राम राठोड, परमेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर माऊली पडोळे, रमेश शिंदे प्रमोद वाघमारे, शिवाजी शेळके यांच्यासह ग्रामस्थ शिवसैनिक मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते

**सच्चे शिवसैनिक**

**धनुष्यबाणासोबत !**

सच्चे शिवसैनिक हे हिंदुत्वाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांनी कधीच आयुष्यात पंजाला मतदान केलेले नाही. त्यामुळे ते कुणाच्याही आमिषाला बळी न पडता धनुष्यबाणालाच मतदान करतील, असा आपला ठाम विश्वास आहे, असे अर्जुनराव खोतकर यांनी स्पष्ट केले.

**महायुतीचाच उमेदवार निवडून आणणार - दानवे**

जालना मतदारसंघातून आपण अपक्ष उमेदवारी दाखल केली होती. परंतु राज्यात महायुतीचे सरकार यावे यासाठी आपण आपला अर्ज मागे घेतला आहे. युतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांनाच विजयी करावे असे आवाहन भास्कर आबा दानवे यांनी जाहीरपणे केले आहे.

# निवडणूक कसल्याही परिस्थितीत जिंकायचीच, कार्यकर्त्याकडून भीमराव धोंडे यांना कानमंत्र

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. कारण की महायुतीच्या नेत्यांमध्ये आष्टी मतदारसंघात लढत होत आहे त्यामुळे राज्यातील प्रमुख नेत्यांसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आष्टी मतदारसंघाच्या लढतीकडे लागले आहे . सर्व प्रकारची ताकद पणाला लावून ही निवडणूक कसल्याही परिस्थितीत जिंकायचीच आहे. याबाबत गावोगाव भेटी दिल्यानंतर अपक्ष उमेदवार माजी आमदार भीमराव धोंडे यांना कार्यकर्ते कानमंत्र देत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की संपूर्ण राज्यातील विधानसभा मतदारसंघाची उमेदवाऱ्या लवकरच जाहीर झाल्या होत्या परंतु आष्टी मतदारसंघाच्या उमेदवारी कडे



सर्वांचे लक्ष लागले होते शेवटच्या दोन दिवसात उमेदवारी जाहीर झाली होती त्यामुळे मुंबईपासून ते गावपातळीपर्यंत आष्टी मतदारसंघ चर्चेचा विषय ठरला आहे. आष्टी -पाटोदा -शिरूर तालुक्यातील लोकांच्या आग्रहास्तव माजी आमदार भीमराव धोंडे हे अपक्ष म्हणून या निवडणुकीत '' शिट्टी '' हे चिन्ह घेऊन उतरले आहेत त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. तीन महिन्यापासून दौरे करीत त्यांनी मतदारसंघ पिंजून काढला आहे. गाव, वाड्या, वस्त्यांना भेटी देऊन पिंजून काढल्या आहेत त्यामुळे त्यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यांनी आष्टी येथे भटक्या विमुक्त समाजाचा मेळावा, मुस्लिम बांधवांचा मेळावा आणि प्रचाराचा नारळ फोडण्याचा शुभारंभ असे तिन्ही कार्यक्रम प्रचंड शक्ती प्रदर्शन करून पार पाडले. या तीनही कार्यक्रमामुळे विरोधकांची झोप उडाली. अपक्ष उमेदवार माजी आमदार भीमराव धोंडे यांना मिळालेले उमेदवारीचे शिट्टी हे चिन्ह त्याच दिवशी घराघरात, गावागावात पोहोचले आहे. कारण की शिट्टी लहानांची आवडती वस्तू आहे . त्यामुळे लहान मुलांनी शिट्ट्या वाजवून घराघरात आणि गावागावात चिन्ह पोहचवले. दौऱ्याच्या निमित्ताने मतदारसंघात गेल्यानंतर कार्यकर्ते,अपक्ष उमेदवार माजी आमदार भीमराव धोंडे यांना निवडणुकीत कसा खेळ खेळायचा याचा कानमंत्र गावागावात देत आहेत.

## आष्टीत आज होणाऱ्या शरद पवार यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - परमेश्वर शेळके

**आष्टी। प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे आष्टी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार महेबुब शेख यांच्या प्रचारार्थ आज शनिवार दि ९ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता आष्टी येथील ईदगाह मैदान येथे माजी केंद्रीय मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांची जाहीर सभा होणार असून सर्वांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, पाटोदा तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव, शिरूर तालुकाध्यक्ष दिपक खोले यांनी केले आहे.





आष्टी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार महेबुब शेख यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला असून सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने महेबुब शेख यांचा विजय निश्चित झाला आहे. त्यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांची आष्टी येथे शनिवारी दुपारी २ वाजता जाहीर सभा होणार आहे. आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी, युवक तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आष्टी तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, पाटोदा तालुकाध्यक्ष शिवभूषण जाधव, शिरूर तालुकाध्यक्ष दिपक खोले यांनी केले आहे.

## भागुजीराव ढेकळे विद्यालयाच्या खेळाडूचे विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत यश

**गेवराई । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर विभागीय स्टेडियम गारखेडा येथे संपन्न झालेल्या विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूने घवघवीत यश संपादन केले आहे.

या क्रीडा स्पर्धेमध्ये १९ वर्षे वयोगटातील कु.जाधव क्रांती मारुती या विद्यार्थिनीने १०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे मध्ये द्वितीय क्रमांक, गोळा फेक तृतीय क्रमांक संपादन केला. या विद्यार्थिनीची १०० मी धावणे व ८०० मी धावणे या क्रीडा प्रकारांमध्ये राज्यस्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याचबरोबर १७ वर्ष वयोगटातील चि.दाभाडे शिवदत्त याने या स्पर्धेमध्ये ४०० मीटर धावणे या प्रकारात द्वितीय क्रमांक संपादन केला. त्याचीही राज्यस्तरीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे. दोन्ही खेळाडूंनी या मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये मिळवलेल्या नेत्रदीपक यशाबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, प्रशासन अधिकारी प्रा. राजा मचाले, कार्यवाहक एम. ए. राऊत, कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए.एस., पर्यवेक्षक राजेंद्र रांजवन, राजेंद्र सोनवणे, क्रीडा शिक्षक घोरड आर. डी., प्रा.कळासे ए.आर., घरत आर.के., सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, समस्त ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## संविधान वाचवण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला विजयी करा -भीमराव हतीअंबिरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान वाचवण्याची आपली जबाबदारी असून संविधान वाचविण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला प्रचंड मताने विजयी करा असे आवाहन कार्यकर्ता मेळाव्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष व प्रभारी सामाजिक न्याय विभाग भिमराव हत्ती अंबीरे यांनी गुरुवारी केले.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार बाजीराव भाऊ जगताप, राष्ट्रवादी चे प्रदेश उपाध्यक्ष दयानंद स्वामी,राष्ट्रवादीचे विधानसभा प्रमुख नारायण डक, भाई गंगाभीषण थावरे, शेकापचे तालुकाध्यक्ष भाई नारायण गोले, राष्ट्रीय काँग्रेसचे तालुकाध्यक्ष



नारायण होके, शिवसेनेचे प्रभाकर धरपडे, कॉम्रेड बाबा सर, कॉम्रेड मोहन जाधव,भास्कर उजगरे,अमोल डाके, दत्ता रंजवन,डॉ. श्रीराम खळगे, कचरू तात्या खळगे,रामराजे सोळंके,शरद यादव, खलील पेंटर मनोज फरके उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले सत्तेत आपण येत नाही हे दिसून आल्यावर महायुतीवाल्यानी लाडकी बहीण ही योजना आणली आहे. तरी महाराष्ट्रात २०० पेक्षा ज्यास्त जागा येणार आहेत.अजित पवाराची राष्ट्रवादी म्हणजे चोरांचा अड्डा असून अजितदादा हे ४० चोराचे बॉस आहेत.ओबीसीना मंडल आयोग लागू करताना विरोध करणाऱ्या भाजपचा डीएनए तेव्हा कोणता होता. असा सवालही त्यांनी यावेळी केला. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# आरे बापरे...सुगावच्या नव मतदाराचे नाव पुसच्या मतदार यादीत

## पहिलाच मतदानाचा हक्क परगावात बजवावा लागणार का?

अंबाजोगाई प्रतिनिधी

आनेक नवतरुणानी विधानसभा निवडणूकीसाठी नवीण मतदार यादीत ऑनलाईन नोंदनी केली आहे.मात्र नवीण मतदार यादीत घोळात घोळ झाला आसुन सुगावच्या तरूणाचे नाव परगावच्या मतदार यादीत नाव आल्यामुळे स्वतःच्या गावत मतदान न करता परगावला जाऊन मतदार यादी प्रमाने मतदान करण्याची वेळ आल्यामुळे नवीण मतदार संभ्रमात आहेत.पहिल्यांदाच मतदार यादीत नाव आल्याचा आनंद तरुणांच्या चेहऱ्यावर पाहीला मिळत आसलातरी तो हक्क दुसऱ्याच्या गावात बजावता येणार आसल्याने कभी खुशी कभी गम अशी स्थिती निर्माण झाली आहे.





विधानसभा निवडणुकीची सध्या जोरात रणधुमाळी सुरु आहे. मतदानाचा हक्क मिळावा यासाठी नव तरुणांनी आपले नाव ऑनलाईन नोंदवले आहे. त्यामुळे आपल्याला मतदानाचा हाक्क पहिल्यांदा मिळणार आसल्याचा आनंद नवतरूणाच्या चेहऱ्यावर दिसत आसला तरी मतदार यादीत घोळच घोळ झाल्याने तरुणांची भ्रमनिराशा झाली आहे. परळी मतदारसंघातील व अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथील तरुण साईश्वर दिलीप आरसुळ यांने ऑगस्ट महिण्या मतदानाचा हक्क मिळावा या साठीऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी केली आहे. विधानसभा निवडणूकीसाठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी साईश्वरने ऑनलाईन मतदान यादी पाहिली आसता त्याचे नाव परळी मतदारसंघातील पुस या गावातील मतदान यादीत नाव आल्याचे निदर्शनात आले आहे. त्यात मतदार ओळखपत्र क्र.

विधानसभा मतदारसंघ क्रमांक २२३,भाग क्रमांक

२४६पुस,मतदान केंद्राचा पत्ता हा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुस आसा उल्लेख आला आहे. परळी मतदारसंघात सुगाव व पुस येत आसले तरी सुगाव ते पुस हा२० कि.मी आंतर पार करुण

परगावच्या मतदार यादीत नाव आल्यामुळे स्वतःच्या गावत मतदान न करता परगावला जाऊन मतदार यादी प्रमाने मतदान करण्याची वेळ तरुणावर आली आहे. नवीण मतदार यादीत घोळात घोळ झाल्याने नवीण मतदार संभ्रमात आहेत.पहिल्यांदाच मतदार यादीत नाव आल्याचा व मतदान करण्याचा हक्क मिळाल्याचा आनंद तरुणांच्या चेहऱ्यावर पाहीला मिळत आसलातरी तो हक्क दुसऱ्याच्या गावात बजावता येणार आसल्याने कभी खुशी कभी गम अशी स्थिती तरुणाची झाली आहे.

# विकास कामाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी भिमराव धोंडेंना विजयी करा -महारुद्र खेडकर

**फुलसांगवी । प्रतिनिधी**

आष्टी- पाटोदा -शिरूर विधानसभा मतदार संघाचे गेल्या पाच वर्षापूर्वी माजी आ.भीमराव धोंडे यांच्याकडे लोकप्रतिनिधित्व होते तेंव्हा मतदार संघामध्ये विकासाची गंगोत्री वाहत होती. मात्र या विकासाच्या गंगोत्रीला गेल्या पाच वर्षात खिळ बसली आहे. या पाच वर्षांमध्ये रखडलेला विकास कामाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे यांना भरघोस मताधिक्याने पुन्हा निवडून द्या धोंडे समर्थक तथा युवा कार्यकर्ता महारुद्र खेडकर यांनी केले आहे.



सन २०१४ च्या निवडणुकीमध्ये आष्टी- पाटोदा -शिरूर विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत माजी आ.भीमराव धोंडे यांना जनतने मोठ्या मताधिक्याने निवडून दिले होते.तर परळी विधानसभा मतदार संघामध्ये पंकजाताई मुंडे यांना जनतेने निवडून दिले.या निवडणुकीनंतर शिवसेना -भाजपच्या सरकारमध्ये पंकजाताई मुंडे यांना मोठे वजनदार कॅबिनेट मंत्रीपद होते. तर प्रीतमताई या बीड जिल्ह्याच्या खासदार म्हणून काम पाहत होत्या. याचा फायदा माजी आ. भीमराव यांनी घेऊन या कार्य काळामध्ये आष्टी -पाटोदा- शिरूर विधानसभा मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली होती. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून अनेक गावांना रस्ते देण्यात आले त्यामुळे अनेक गावांना दर्जेदार रस्ते मिळाले. तीनही तालुक्यामध्ये जनसंधारणाचे कामेही मोठे प्रमाण करण्यात आले होते. त्याचबरोबर शेतकऱ्यांनाही पिक विमा सह मोठ्या प्रमाणात अनुदान उपलब्ध होत होते. मात्र गेल्या पाच वर्षांमध्ये ही सर्व कामे रखडली आहेत. ना शेतकऱ्यांना कुठलाही पिक विमा मिळाला की कुठलेही अनुदान यामुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडण्यासाठी त्याचबरोबर आष्टी - पाटोदा -शिरूर या तीनही तालुक्यामध्ये विकास कामांना गती देण्यासाठी माजी भीमराव धोंडे हे पुन्हा एकदा अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांच्या या विकासभिमुख कामांना गती देण्यासाठी आपण सर्वांनी त्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे तरच विकासाचा बॅकलॉग पुन्हा भरून काढता येणे शक्य आहे. तरी मतदार मायबाप जनतेने विकास कामाचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे अवाहन धोंडे समर्थक तथा युवा कार्यकर्ते महारुद्र खेडकर यांनी आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातील जनतेला केले आहे.

# पृथ्वीराज साठे यांच्या विजयासाठी अंबाजोगाईकर एकवटले





## राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने सर्वपक्षीय प्रचारफेरी स मतदारांचा प्रचंड प्रतिसाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केज मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या विजयी प्रचारार्थ राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने अंबाजोगाई शहराच्या प्रभाग क्रमांक १,३,४, च्या भागात प्रचारफेरी काढण्यात आली होती. या प्रचारफेरीस संपूर्ण अंबाजोगाई शहरातील मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रत्येक ठिकाणी या प्रचार फेरीतील नेत्यांचे स्वागत मोठ्या उत्साहात करतांना आढळून येत होता. शुक्रवार दि ९ रोजी निघालेल्या प्रचारफेरीत राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकिशोर मोदी, डॉ नरेंद्र काळे, बबन लोमटे,महादेव आदमाने, शिवसेनेचे मदन परदेशी , आरपीआय चे ॲड दीपक कांबळे, समाजवादी पार्टीचे ॲड शिवाजी कांबळे, परदेशी त्याचबरोबर दिलीप काळे,पंडित हुलगुंडे, हाजी खालेक, दिनेश भराडीया, धम्मा सरवदे,बबन पानकोळी , सुभाष पानकोळी, चंद्रकांत महामुनी,अंकुश हेडे, मूनवर भाई, जावेद गवळी यांच्यासह अनेक कार्यकर्ते तसेच पृथ्वीराज साठे यांच्या पत्नी जयश्री साठे, कल्पना साठे, बालिका भोसले, चंद्रकला देशमुख, प्रेमलता लोदगे, सत्यशीला शिंदे, आशा जोगदंड, या सहभागी झाल्या होत्या.

महाविकास आघाडीचे केज विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार पृथ्वीराज शिवाजीराव साठे यांच्या प्रचारार्थ आज अंबाजोगाई शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बलुतेचा मळा, कुत्तर विहीर, भट गल्ली, जैन गल्ली,कोठाड गल्ली, झारे गल्ली,धनगर गल्ली, बाराभाई गल्ली, दमगानपुरा, मनियार गल्ली, भोई गल्ली, बागवान गल्ली, सातपुते गल्ली, मंडी बाजार येथील परिसरात प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते.या प्रचारफेरीदरम्यान ५०० च्यावर कार्यकर्ते, महिला व पदाधिकारी सहभागी झाले होते. या प्रचारफेरीत अंबाजोगाई शहर व केज विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हासमोरील बटण दाबून पृथ्वीराज साठे यांना सेवा करण्याची संधी द्यावी अशी साद मतदारांना दिली. विद्यमान आमदार हे जनतेच्या मूलभूत मागण्यांकडे डोळेझाक करत असून ते केवळ ठराविक गुत्तेदारांना पोसण्याचे काम करीत आहेत . अशा सत्तापिपासू माणसांना सत्तेपासून दूर ठेवून एक जन् मानसाशी नाळ जोडला गेलेला माणूस पृथ्वीराज साठे याना येणाऱ्या २० तारखेला त्याच्या तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हावर बटन दाबून भरघोस मतांनी निवडुन देण्याची विनंती राजकिशोर मोदी व प्रचारफेरीतील सर्व नेते हे करत होते.तुमचा आमचा सर्वांच्या हक्काचा असा उमेदवार म्हणजे पृथ्वीराज साठे हा असून तो निवडून आल्यानंतर केज मतदार संघातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी एमआयडीसी च्या माध्यमातून मोठा प्रकल्प उभारण्यासाठी प्राधान्य देऊन त्यांच्या रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठीचे अभिवचन मतदारांना दिले . त्याचबरोबर महिलांसाठी कुटिरोद्योग, पिण्याच्या पाण्यासाठी सिंचन प्रकल्प, अंबाजोगाई जिल्हा निर्मितिचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न शील राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात येते होते. अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ काढलेल्या प्रचार रॅलीमध्ये सुनील वाघळकर, माणिक वडवणकर,भगवान ढगे, दत्ता सरवदे,हमीद चौधरी, सलीम चौधरी, सय्यद रशीद,जावेद गवळी, गोविंद पोतंगले, शाकेर काझी, अकबर पठाण, मुशीर बाबा, रमेश गायसमुद्रे, जमादार पठाण, आकाश कऱ्हाड, दत्ता हिरवे, महेबूब गवळी, रफिक गवळी,कैलास कांबळे, यश अलझेंडे, शंकर रणदिवे,ओम गवळे, साठे, गायकवाड , औचित्ते, कुरेशी, यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

ऐन निवडणुकीच्या काळात बीड मतदार संघात आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) मध्ये, इतर पक्षाच्या कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात होत आहेत. बुधवार (दि.६) रोजी बीड शहरातील मोमीनपुरा भागातील तसेच गुरूवारी (दि.७) रोजी नाळवंडी येथील अनेक कार्यकर्त्यांनी आ. क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये प्रवेश केला.



मोमीपुरा भागातील अनेक कार्यकर्ते राष्ट्रवादीत

बीड शहरातील मोमीनपुरा भागातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे कार्यकर्ते असलेले ईशान मोमीन, आरसोलन मोमीन, मोशोरन मोमीन, रिजवान मोमीन, आवेझ मोमीन, शेख रिजवान, शेख नविद यांनी आपल्या समर्थकांसह बुधवार (दि.६) रोजी तसेच बीड तालुक्यातील नाळवंडी येथील ऋषी सोनवणे, जीवन राठोड, कृष्णा घोडके यांनीही आ. संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर व देशाचे नेते खा.शरदचंद्र पवार साहेब यांच्या पुरोगामी विचारांवर विश्वास ठेवून आ. संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात जाहीर प्रवेश केला.

# भाजप-राष्ट्रवादीचा सुफडा साफ करण्यासाठी बदामराव पंडितांना विजयी करा -अनिरुद्ध लोंढे

**गेवराई । प्रतिनिधी**

राज्यात सत्तेत येण्यासाठी सगळे तत्त्व घाण ठेवून, भारतीय जनता पार्टीच्या देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना फोडली. राष्ट्रवादी काँग्रेस फोडली आणि महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून लोकप्रिय ठरलेल्या उद्धव ठाकरे यांना सत्तेतून बाजूला सारून, स्वतः सत्तेत येऊन बसले. या काळात महायुतीने मराठा, धनगर, मुस्लिम यांना आरक्षण तर दिले नाहीच, पण या उलट मराठा विरुद्ध ओबीसी वाद लावला. समाजाला दिशाहीन करून वाद लावणाऱ्या भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेसचा सुफडा साफ करण्यासाठी गेवराईकर सज्ज आहे. यावेळी बदामराव पंडित यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन शिवसेनेचे अनिरुद्ध लोंढे यांनी केले आहे.



महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मशाल चिन्हावर बदामराव पंडित हे गेवराई विधानसभा मतदारसंघाची निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या प्रचारासाठी मतदारसंघातल्या प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल मध्ये शिवसेना आणि बदामराव पंडित मित्रमंडळाचे पदाधिकारी स्वतः गावोगाव जाऊन मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत बदामराव पंडित यांना विजयी करण्याचे आवाहन करत आहेत. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे विविध गावांमध्ये जाऊन मतदारांच्या भेटी घेत

# आज होणाऱ्या शरद पवार यांच्या सभेला उपस्थित रहा-विनोद पवार

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस,शिवसेना (उबाठा) प्रणित महाविकास आघाडीच्या बीड जिल्ह्यातील अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांची परळी,बीड,आष्टी या ठिकाणी आज दि.९ नोव्हेंबर २०२४ शनिवार रोजी जाहीर सभा होणार आहेत.तसेच आष्टी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी पक्षाचे (शरद पवार गट) महेबूब शेख हे अधिकृत उमेदवार आहेत.त्यांच्या प्रचारार्थ आष्टी येथेही दुपारी ३ वाजता जाहीर सभा होत आहे.या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विनोद पवार राष्ट्रवादी काँग्रेस युवक तालुका अध्यक्ष पाटोदा (शरद पवार गट) यांनी केले आहे.



# प्रस्थापितांना वैतागलेला गेवराईकर म्हणतोय, आता फक्त पुजाताईच!

**गेवराई । प्रतिनिधी**

प्रस्थापितांकडून होत असलेले तेच तेच राजकारण आणि एवढ्या वर्षात विकासच बघायला न मिळाल्याने वैतागलेले शेतकरी आणि सर्वसामान्य जनता यंदा गेवराई विधानसभेत परिवर्तन करण्याच्या तयारीत आहे, नवा आणि फ्रेश चेहरा, शिवाय शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या कामाला नेहमीच उपलब्ध असणार्या पूजाताई मोरे यांना गेवराई मतदारांतून वाढता पाठिंबा मिळत आहे.

गेवराईचे राजकारण हे पंडित आणि पवार या भोवतीच फिरत आले आहे. या प्रस्थापित घराण्यांनी विकासाची खोटी आश्वासने देत आजवर लोकांच्या मतावर राज्य केले. प्रत्येक वेळी तेच तेच राजकारण आणि तेच तेच चेहरे बघून मतदार संघातील जनता वैतागली आहे. विशेष करून शेतकरी वर्ग आणि सर्वसामान्य या राजकारणाला आणि अविकसितपणाला कंटाळले असून, यंदा परिवर्तन घडवायचे असा संकल्प त्यांनी केल्याचे दिसत आहे. याचसाठी नवा पर्याय म्हणून पूजाताई मोरे यांच्याकडे बघितले जाते. शेतकरी आणि सर्वसामान्य जनता याबाबत खुलेआम बोलू लागली आहे. यंदा परिवर्तन घडवायचेच आणि जे आपला प्रश्न लावून धरतील त्यांना निवडून द्यायचे, असा विचार मतदारांनी केला आहे. पुजाताई मोरे यांनी शेतकर्यांसाठी आजवर केलेले कार्य आणि सर्वसामान्यांच्या ◀◀ पान ३ वर



# डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.सारिकाताईंनी लिंबागणेश पिंजून काढले



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

महायुतीचे बीडचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी लिंबागणेश जिल्हा परिषद पिंजून काढले. त्यांच्या दौऱ्यास ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रचारात मुसंडी मारली असून त्यांच्या प्रचारार्थ डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील मांजरसुंबा,

# मोहनदादा जगताप यांना डोंगरपट्ट्यातील गावांमध्ये मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## डोंगरपट्ट्यातील मतदार प्रचंड मताधिक्याची लीड देणार

**वडवणी । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार मोहन बाजीराव जगताप यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.

डोंगरपट्ट्यातील गावांमध्ये त्यांच्या दौऱ्यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद भेटत असून डोंगरपट्ट्यातील गावांमधील युवकांनी मोहनदादा जगताप यांची निवडणूक हातात घेतली आसल्याचे चित्र आज पाहण्यास मिळत आहे.धारूर तालुक्यातील कारी,बोडखा, कासारी ,कचारवाडी,कांदेवाडी, अरणवाडी,घागरवाडा,चोरांबा ढगेवाडी, ◀◀ पान ३ वर



# माजलगाव विधानसभा मतदारसंघात वंचित आघाडीच्या उमेदवारांची प्रचार यंत्रणाच दिसेना?

## मुस्लीम समाजाचा उमेदवार असुनही, वंचितांच्या उमेदवाराचा प्रचार मुस्लीम बहुल भागात दिसतच नाही

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील माजलगाव विधानसभा मतदारसंघात वंचित आघाडीचे प्रमुख श्रद्धेय बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांनी मतदारसंघ मुस्लीम बहुल असल्याने या ठिकाणी दलीत-मायक्रो ओबीसी-मुस्लीम हे समिकरण लक्षात घेऊन या ठिकाणी वंचित आघाडीचाच उमेदवार निवडून येईल हे समिकरण लक्षात घेता या विधानसभा मतदारसंघात मुस्लीम समाजातील मायक्रो ओबीसी असणाऱ्या पिंजारी जातीच मुस्लीम बहुल उमेदवाराला उमेदवारी देऊन मायक्रो ओबीसी व मुस्लिम समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.मात्र या ठिकाणच्या वंचितांच्या उमेदवारांनी मात्र बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांच्या उद्देशालाच हरताळ फासल्याचे दिसून येत असुन माजलगाव विधानसभेतील वंचीत आघाडीच्या उमेदवाराची प्रचार यंत्रणाच माजलगाव ,धारुर व वडवणी तालुक्यातील कोणत्याही गावात निदर्शनास येत नसल्याने वंचितचा उमेदवार मॅनेज तर नाही ना? अशा प्रकारच्या वावड्या माजलगाव,धारुर व वडवणी विधानसभा मतदारसंघातील मतदारात ◀◀ पान ३ वर




**वंचितचा उमेदवार मॅनेज असल्याच्या चर्चेला मतदारांतून उधाण**

# दलित मतदार विजयसिंह पंडित यांच्या विजयाचा शिल्पकार होईल रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर यांचा गेवराईमध्ये झंझावात

**गेवराई । प्रतिनिधी**

सरकारी नोकरीतून भ्रष्ट मार्गाने कमविलेल्या पैशांतून दलित, वंचित मतदारांना प्रलोभने देण्याचा प्रयत्न होत आहे, स्वाभिमानी मतदार कोणाच्याही अमिषाला बळी पडणार नाही. या निवडणुकीत दलित, वंचित, ओबीसी आदी मतदार ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या पाठिशी खंबीरपणे उभा आहे. गोर-गरीबांच्या सुख-दुःखात साथ देणाऱ्या विजयसिंह पंडित यांना विधानसभेत पाठविण्याचा निर्धार मतदारांनी केला आहे. दलित, वंचित मतदार विजयसिंह पंडित यांच्या विजयाचा शिल्पकार होईल असे प्रतिपादन रिपाईचे गेवराई तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर यांनी केले. त्यांनी रेवकी, संगमजळगाव, गुंतेगाव, बोरगाव, पाथरवाला आदी भागांत झंझावाती दौरे करून प्रचाराला शुभारंभ केला आहे.



गेवराई विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ मित्रपक्षाचे पदाधिकारी जोमाने कामाला लागले आहेत, गेवराई तालुका रिपाई (आठवले गट) चे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर यांच्या झंझावाती दौऱ्यामुळे मतदार संघात विजयसिंह पंडित यांचे वारे वाहू लागले आहे. त्यांनी रेवकी, संगमजळगाव, गुंतेगाव, बोरगाव, पाथरवाला आदी भागांत झंझावाती दौरे करून प्रचाराला शुभारंभ केला. यावेळी बोलताना त्यांनी विरोधकांवर टिका केली. ते म्हणाले की, शासकीय नोकरीतून भ्रष्ट मार्गाने कमविलेले करोडो रुपये काही लोक निवडणुकीत मतदारांना अमिष दाखविण्यासाठी बाहेर काढत आहेत तर काही उमेदवार बौध्द समाजाच्या स्मशानभुमीची जागा हडप करण्याचा प्रयत्न करत आहेत. आम्ही पैशाने गरीब असलो तरी ◀◀ पान ३ वर

# महेबुबभाई शेख यांचा गाव भेट संवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा निवडणूक ही प्रेतेष्ठेची होत असून २३१ आष्टी मतदार संघाचे महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार मा.श्री.महेबूबभाई इब्राहीम शेख यांच्या प्रचारार्थ ७ नोव्हेंबर २०२४ रोजी दौलावडगाव गटातील सावरगाव,शेडाळा,घाट देऊळगाव,लमणतांडा, चिचेवाडी,अरणविहरा हरेवाडी मराठवाडी बांदखेल केळ पिंपळगाव घाट कारखेल साले वडगाव अंभोरा इत्यादी सर्व गावांना गाव भेट संवाद द्वाराला जनतेतून चांगला प्रतिसाद मिळत असून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीमत्व आणि सर्वसामान्य जनतेच्या मनातील माणूस म्हणून श्री महेबुब भाई शेख यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्रामस्थांनी आदराने स्वागत केले हे सदैव स्मरणात राहील, आपल्या सर्वांचे सहकार्य असेच पाठशी राहुदेत, आपल्या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध आहे. आष्टी - पाटोदा- शिरूर मतदारसंघाच्या शाश्वत विकासासाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने निवडून द्या असे आवाहन महेबुब भाई यांनी मतदारांना केले.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# झंझावाती प्रचारामुळे कसब्यातील वातावरण झालं धंगेकरमय

**पुणे । प्रतिनिधी**

कसबा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी, इंडिया फ्रंट आणि मित्रपक्षांचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या सध्या झंझावाती पदयात्रा सुरू आहेत. आज सकाळी या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांची जीप यात्रा झाली. या जीप यात्रेत महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते दुचाकींवरून सहभागी झाले होते. या झंझावाती प्रचारामुळे कसबा विधानसभा मतदारसंघातील सगळेच वातावरण धंगेकरमय झाल्याचा अनुभव आला.

शुक्रवारी सकाळी सूर्या हॉस्पिटलपासून जीप यात्रेला प्रारंभ झाला. त्यानंतर ही यात्रा पवळे चौक, कुंभारवाडा, गावकोस मारुती, हमजे खान चौक, अशोक चौक, रामोशी गेट, गोकुळ वस्ताद तालीम, घसेटी पूल या मार्गावर काढण्यात आली.



जीप यात्रेत खा. सुप्रिया सुळे आणि उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यासह शहर काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष मोहन जोशी, प्रदेश काँग्रेस सरचिटणीस अभय छाजेड,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रभारी शहराध्यक्ष अंकुश काकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संजय मोरे, विशाल धनवडे, राजेंद्र शिंदे, गणेश नलावडे, संदीप गायकवाड इत्यादी सहभागी झाले होते. या जीप यात्रेचे जागोजागी जोरदार स्वागत करण्यात आले. महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी कसबा विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीप्रमाणेच एकजूट दाखवून पुन्हा एकदा विजय खेचून आणावा आणि धंगेकर यांना विजयी करावे, असे आवाहन सुळे यांनी केले.

# पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघातील मतदान केंद्रांची ठिकाणे बदलली

**पुणे । प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघातील ५ मतदान केंद्रांच्या ठिकाणांमध्ये बदल करण्यात आला असून, ही मतदान केंद्रे गृहनिर्माण संस्थांमध्ये स्थापन करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धार्थ भंडारे यांनी कळविली आहे.



या बदलानुसार मोलेदिना टेक्निकल ज्युनिअर कॉलेज, शंकरशेठ रोड, इलेक्ट्रीकल विभाग, खोली क्रमांक १ येथील मतदान केंद्र क्रमांक २२६ मीरा को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, शंकरशेठ रोड, सेव्हन लव्हज चौक येथे, मोलेदिना टेक्निकल ज्युनिअर कॉलेज, शंकरशेठ रोड, इलेक्ट्रीकल विभाग, खोली क्रमांक २ येथील मतदान केंद्र क्रमांक २२७ आनंद पार्क को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. प्लॉट क्रमांक ३९०-२,३,४ शंकरशेठ रोड याठिकाणी, नूतन प्राथमिक विद्यालय, टेनरी कॅम्प, नेताजी नगरजवळ, वानवडी, खोली क्रमांक १ व २ येथील मतदान केंद्र क्रमांक २४५ व २४६ नेताजी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. नेताजीनगर, वानवडी येथे, तसेच क्रूट मेमोरियल इंग्लिश मीडियम स्कूल, वानवडी, तळमजला, खोली क्रमांक ९ येथील मतदान केंद्र क्रमांक २७३ रहेजा गार्डन फेडरेशन को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी, केदारी पेट्रोल पंप समोर, वानवडी येथे असणार आहे.

# महाविकास आघाडीचा जाहीरनामा म्हणजे थापा; अजित पवार यांचा हल्लाबोल

**पुणे । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीची पंचसूत्री हा जाहीरनामा म्हणजे फक्त थापा आहेत. समोर पराभव दिसत असल्याने 'खोटं बोल, पण रेटून बोल', असा धंदा त्यांनी सुरू केला आहे. त्यांनी दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी तीन लाख कोटी इतका वार्षिक निधी लागेल. केंद्रात समविचारी सरकार असल्याशिवाय हे शक्य नाही, अशा तिखट शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाविकास आघाडीवर हल्ला चढवला.

खराडी येथे झालेल्या महायुती घटक पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्यात अजित पवार बोलत होते. यावेळी महायुतीचे वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार आमदार सुनील टिंगरे, माजी आमदार जगदीश मुळीक, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक मानकर, तसेच महायुतीच्या घटक पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.



पवार पुढे म्हणाले, लोकसभा निवडणुकी वेळी काँग्रेस आणि घटक पक्षांनी राज्यघटना बदलणार असल्याचा केलेला खोटा प्रचार आता लोकांच्या लक्षात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना निवडणुकीत पराभूत करणाऱ्या काँग्रेस आणि तिच्या बगलबच्चांनी संविधानाच्या गप्पा मारू नयेत. उमेदवारी अर्ज दाखल करताना भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये रंगलेल्या राजकीय नाट्याबद्दल बोलताना पवार म्हणाले, देवेंद्र फडवणीस यांनी दिलेले ; जगदीश मुळीक यांना विधान मंडळात पाठवण्याचे आश्वासन पूर्ण करण्यासाठी तुम्ही येथून सुनील टिंगरे यांना निवडून द्या. त्यानंतर मुळीक यांना विधान परिषद देऊन वडगाव शेरीला दोन आमदार देण्याची जबाबदारी आम्ही घेऊ. आमदार टिंगरे म्हणाले, अजित पवार यांच्यामुळे वडगाव शेरीतील विविध प्रकल्पांसाठी मोठा निधी मिळाला. याप्रसंगी जगदीश मुळीक यांनीही महाविकास आघाडीवर हल्लाबोल करीत टिंगरे यांना निवडून देण्याचे आणि त्यासाठी मेहनत घेण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन केले.

अजित दादांनी भरला दम.

कार्यकर्त्यांना प्रचार करताना कोणी फोन करून धमकवत असेल तर आम्ही सुद्धा हातात बांगड्या भरलेल्या नाहीत. तुमची सगळी अंडी पिल्ले मला माहित आहेत, अशा शब्दात अजित पवार यांनी येथील महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आमदार बापूसाहेब पठारे यांचे नाव न घेता दम भरला.

# दरोड्याच्या तयारीतील तिघांना पोलिसांनी पकडले; कंटेनरसह १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**शिरूर । प्रतिनिधी**

सरदवाडी (ता. शिरूर) येथील पुणे -नगर महामार्गावर दरोड्याच्या तयारीमध्ये थांबलेल्या तिघांना कंटेनर वाहन व दरोड्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्यांसह जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व शिरुर पोलिसांच्या पथकाला यश आले आहे. पकडलेल्या तिघांकडून १५ लाख १७ हजाराचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.




पोलिसांची चाहूल लागताच त्यांचे दोन साथीदार पळून गेले आहेत. पोलिसांनी कुतुबुद्दीन अख्तर हुसेन (वय ३१ वर्षे रा. सोमका ता. पहरी जि. भरतपूर राजस्थान), यासीन हारुन खान (वय ३२ वर्षे रा. मुदैता ता. पुन्हाना जि. नुहू राजस्थान), व राहुल रशिद खान (वय ३२ वर्षे रा. फलैंडी ता. पुन्हाना जि. नुहू राजस्थान) यांसह पळून गेलेले नौशाद उर्फ नेपाळी व लेहकी ( पूर्ण नाव पत्ता माहित नाही ) यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केलेआहे. याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार संजू ज्ञानदेव जाधव (रा. शिरुर) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

सरदवाडी येथील पुणे नगर महामार्गावर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार संजू जाधव, राजू मोमीन, जनार्दन शेळके व तुषार पंधारे हे रात्रगस्त घालत असताना येथील हरियाना राजस्थान मेवात ढाब्याजवळ काही जण (आर जे ५२ जि ए ७९१६) या कंटेनर मध्ये दरोड्यासाठी वापरल्या जाणारे साहित्य घेऊन दरोडयाच्या तयारीमध्ये थांबले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर त्यांनी शिरुर पोलिसांना माहिती देत शिरुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत गिरी, पोलीस हवालदार नाथा जगताप, पोलीस शिपाई निखील रावडे, नीरज पिसाळ, नितेश थोरात, विजय शिंदे यांना बोलावून घेत कंटेनर जवळ गेले असता पोलिसांची चाहूल लागताच दोघेजण पळून गेले.

दरम्यान पोलिसांनी कंटेनरमध्ये पाहणी केली असता त्यामध्ये दरोडयाच्या तयारीत असलेले तिघेजण मिळून आले, त्यांची झडती घेतली असता त्यांच्याजवळ गॅस सिलेंडर, कटावणी, लोखंडी गज, दोरी यांसह आदी साहित्य मिळून आले.दरम्यान पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्या जवळील कंटेनर तसेच दरोड्यासाठी वापरले जाणारे साहित्य असा तब्बल पंधरा लाख सतरा हजार रुपयांचा ऐवज जप्त केला, यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत गिरी हे करत आहेत.

# मुलांना जीवे मारण्याची धमकी देऊन महिलेवर सामूहिक अत्याचार

**पुणे । प्रतिनिधी**

मुलांना जीवे मारण्याची धमकी देऊन एका महिलेवर सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत एका २५ वर्षीय महिलेने स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सोहेल सबीक खान (वय-२०), कालू आबन खान (वय-५०) दोघे मूळ रा. रा. चामडियाक, जि. पाली, राजस्थान) अशी अत्याचार केलेल्या आरोपींची नावे आहेत. तर, दिलदार खाजू खान (वय-२७), रा. हापत, जि. जोधपूर, राजस्थान) याच्याविरुद्ध महिलेस धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला पतीसह राजस्थानहून कामानिमित्त पुण्यात आली होती. हे दांपत्य स्वारगेट परिसरात त्यांच्या नातेवाइकाच्या घराजवळ भाडेतत्त्वावर खोली घेऊन राहत होते. जून महिन्यात पीडित महिला घरी एकटी असताना आरोपी सोहेल तिच्या घरी आला. त्याने महिलेला धमकावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर तिचा गळा दाबून कोणाला सांगितल्यास मुलांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पीडित महिला सप्टेंबर महिन्यात नातेवाइकाच्या घरी गेली होती. त्यावेळी आरोपी कालू आणि सोहेल या दोघांनी महिलेवर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर तिला मारहाण करून समाजात बदनामी करण्याची धमकी दिली. या घटनेमुळे घाबरलेली महिला राजस्थानमधील तिच्या मूळ गावी गेली. तेव्हा आरोपी दिलदारने महिलेच्या मोबाईलवर संपर्क साधून पोलिसांत तक्रार दिल्यास मारण्याची धमकी दिली. पीडित महिलेने मूळ गावी गेल्यानंतर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी राजस्थान पोलिसांनी गुन्हा दाखल करून तो तपासासाठी स्वारगेट पोलिसांकडे सोपविला. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पूनम पाटील करीत आहेत.

# येरवड्यात आढळला कुत्र्यांनी खाल्लेला अर्धवट मृतदेह

**येरवडा । प्रतिनिधी**

येरवडा येथील न्याती बिल्डिंगच्या समोरील झाडाझुडपांत सडलेला अर्धवट अवस्थेतील मृतदेह मिळून आला आहे. दरम्यान, मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतदेहाच्या कमरेखालील भाग थोडाच शिल्लक असून, वरील भाग कुत्र्यांनी पूर्णपणे खाल्लेला दिसून येत आहे.

याबाबत पोलिस नियंत्रण कक्षाकडून गुरुवारी (दि. ७) सकाळी पावणेनऊ वाजता येरवडा पोलिसांना माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिस तातडीने तेथे पोहोचले. त्यांनी पाहणी केली असता या मृतदेहाला आठ ते दहा दिवस झाले असावेत. मृतदेह सडलेल्या अवस्थेत असून, मृताचा बराचसा भाग कुत्र्यांनी खाल्लेला दिसून येत आहे. कमरेपासून खालील भाग थोडा शिल्लक असून, कवटी व वरील भाग पूर्णपणे खाल्लेला आहे. हा मृतदेह बेवारस व्यक्तीचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह ससून हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे. या भागामध्ये बरेच फिरस्ते, बेघर लोक झोपत असतात. त्यांच्यापैकी कोणाचा तरी हा मृतदेह असावा, असा संशय आहे, असे येरवडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र शेळके यांनी सांगितले.

# आता 'किरण दगडे पॅटर्न' चालणार - प्रवीण तरडे

**भोर । प्रतिनिधी**

शेतकर्यांवर चित्रपट काढण्यासाठी मदतीला धावलेला पहिला माणूस किरण दगडे आहे. तो केवळ आशेचा नाही तर भविष्याचा किरण आहे. विचार, बांधलकी यापेक्षा काम महत्वाचे आहे. आज याच कामाच्या जोरावर अपक्ष उमेदवाराच्या सभेला झालेली गर्दी पाहून यंदा भोर, राजगड, मुळशी विधानसभेत 'मुळशी पॅटर्न'च्या यशानंतर 'किरण दगडे पॅटर्न' चालणार, असा विश्वास प्रसिद्ध दिग्दर्शक, अभिनेते प्रवीण तरडे यांनी व्यक्त केला.

भोर विधानसभा मतदारसंघात महायुतीतील भाजपचे माजी नगरसेवक किरण दगडे यांनी अपक्ष उभे राहून आज रायरेश्वराचे




दर्शन घेऊन प्रचाराचा नारळ फोडला. त्यानंतर भोर येथे झालेल्या प्रचार सभेत प्रविण तरडे बोलत होते. यावेळी बबनराव दगडे, गोविंद रणपिसे, उमेदवार किरण दगडे यासह भोर, राजगड, मुळशीतील किरण दगडे समर्थक उपस्थित होते. प्रविण तरडे म्हणाले, अपक्ष उमेदवाराच्या सभेला झालेली गर्दी ही त्या उमेदवाराचे काम पाहून होते. सध्याचा काळ हा अपक्षांचा आहे. किटली चिन्ह हे सर्वसामान्याचे आणि गोडवा देणारे आहे. त्यामुळे आपली व्यक्ती फिक्स, किटली फिक्स आणि कामही फ्रेश असणार. शेतकर्याचा मुलगा असलेला किरण निखळता झरा असून, प्रत्येक शेतकर्याने आपल्या शेताकडे वळवायचा आहे.

# यंदा १५० वर्षे जुन्या रथातून होणार माउलींचा रथोत्सव

**आळंदी । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे जन्मोत्सव सप्त शतकोत्तर वर्ष (७५० वे वर्षे) सुरू असून, त्यानिमित्ताने वर्षभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन आळंदी देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. याच सप्त शतकोत्तर वर्षाचे औचित्य साधून आळंदी देवस्थानने भाविकांसाठी अनोखी पर्वणी उपलब्ध करून दिली असून, भाविकांना यंदा कार्तिक वारी सोहळ्यात माउलींचा रथोत्सव हा वैभवी आणि प्राचीन असलेल्या १५० वर्षे जुना लाकडी रथ पाहता येणार आहे.

तब्बल २३ फूट उंच आणि अंदाजे १ हजार २०० किलो वजन असलेल्या या रथातून माउलींचा आळंदी शहरातून रथोत्सव पार पडणार आहे. सध्या देवस्थानकडून रथाची डागडुजी व रस्त्यावर चालण्याचा सराव सुरू आहे. यामुळे ज्या रथातून रथोत्सव सुरू करण्यात आला अशा मूळ लाकडी रथातून यंदाचा रथोत्सव



पाहण्याचे साक्षीदार भाविक ठरणार आहेत. ही अनोखी पर्वणी असून, याचे स्वागत आळंदीसह राज्यभरातील भाविकांकडून होत असल्याचे दिसून येत आहे.

इ.स. १८७३ मध्ये श्रीगुरू नरसिंह सरस्वतीस्वामी महाराज आळंदीला आले. इ.स.१८८६ ला त्यांनी आळंदीत समाधी घेतली. आपल्या ११ वर्षे आळंदीतील कार्यकाळात त्यांनी माऊलींच्या वैभवात भर टाकण्यात मोठे योगदान दिले. माउलींच्या कार्तिकी उत्सवात रथोत्सव त्यांनी सुरू केला. त्यासाठी सुरेख नक्षीकाम असलेला शिसम लाकडाचा भव्य रथ त्यांनी माऊलींसाठी बनविला. त्यातून पुढील काही दशके रथोत्सव या रथातून सुरू होता. मात्र, तत्कालीन रस्त्यांची अवस्था आणि रथाची भव्यता पाहता पुढे देवस्थानने हजेरी श्रीमारुती मंदिर चौकात भव्य रथ उभारणी मंडप बांधला व त्यात हा रथ अनेक वर्षे ठेवण्यात आला. अलीकडे काही वर्षांपूर्वी तेथील मंडप पाडून हा रथ आळंदी-वडगाव रस्ता येथील विश्रांत वड या देवस्थानच्या बागेत भाविकांना पाहण्यासाठी संवर्धित करत ठेवण्यात आला होता. देवस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, पालखी सोहळाप्रमुख, विश्वस्त योगी निरंजन नाथ, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे या नवनियुक्त विश्वस्त मंडळींनी हा रथ यंदाच्या कार्तिकी वारी सोहळ्यात रथोत्सवासाठी बाहेर काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आणि त्याबाबतची तयारीदेखील आता सुरू झालेली आहे. यामुळे लवकरच भाविकांना एक प्राचीन आगळीवेगळी रथोत्सवाची परंपरा पुन्हा एकदा या निमित्ताने पाहायला मिळणार असल्याचे दिसून येत आहे. आता रथाची डागडुजी अंतिम टप्प्यात असून, सध्या सराव सुरू आहे, अशी माहिती प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी दै. 'पुढारी'शी बोलताना दिली. पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर यांनी याबाबत दै. 'पुढारी'शी अनेकदा बोलताना हा रथ पुन्हा सुरू करण्याबाबत संकल्प केला होता. हा संकल्प यंदा पूर्ण होत असल्याने त्यांनीदेखील याबाबत आनंद व्यक्त केला आहे.

# मारहाण, विनयभंगप्रकरणी आरोपीला ५ वर्षांची शिक्षा

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतूर (ता. जुन्नर) येथील पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन तिला मारहाण करून तिचा विनयभंग केला. याप्रकरणी राजगुरुनगर (खेड) येथील सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी आरोपी कृष्णा मारुती उंबरे (वय ३९, रा. जुन्नर) याला पाच वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.

ओतूरचे सहायक पोलिस निरीक्षक एल. जी. थाटे यांनी दिलेल्या माहितीनुसार २०१६ मध्ये आरोपी कृष्णा उंबरे याच्यावर एका अल्पवयीन मुलीस पळवून नेऊन तिला मारहाण करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी भारतीय दंड विधान कलम ३५४, ३६३, ३२३ सह पॉक्सो कायदा कलम ८, १२ अन्वये गुन्हा दाखल झाला होता.

या गुन्ह्याचा योग्य तपास करून या गुन्ह्याचे दोषारोपपत्र या गुन्ह्याच्या तत्कालीन तपासी अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक अर्चना दयाळ यांनी सत्र न्यायालय खेड येथे विहित वेळेत दाखल केले होते. या गुन्ह्याचा निकाल खेड येथील सत्र न्यायालयाचे न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी ६ नोव्हेंबर २०२४ जी दिला. यामध्ये आरोपी कृष्णा उंबरे यास भा. द. वि. कलम ३५४ मध्ये दोषी धरून ३ वर्षे सश्रम कारावास व १,००० रुपये दंड व दंड न भरल्यास एक महिना साधी कैद आणि कलम ३६३ मध्ये पाच वर्षे सश्रम कारावास व १,००० रुपये दंड व दंड न भरल्यास एक महिना साधी कैद, अशी शिक्षा सुनावली आहे. या गुन्ह्यामध्ये सरकारी वकील मिलिंद पांडकर, जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी पोलिस निरीक्षक संतोष घोळवे, सहायक पोलिस निरीक्षक लहू थाटे, खेड सेशन कोर्ट पैरवी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक एस. बी. खरात, कोर्ट पैरवी अंमलदार पोलिस कॉन्स्टेबल गोविंद ढाकणे यांनी कामकाज पाहिले.